नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५२ * अंक २०९ * * अकोला * रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

# सुनेत्रा पवार नव्या उपमुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :
अजित पवारांच्या निधनानंतर चौथ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आज उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. यासोबतच त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत.

विधानभवनातील सेंट्रल हॉलमध्ये राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव आणि राजशिष्टाचार अधिकारी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील आमदार आणि नेते उपस्थित होते.

अवघ्या दहा मिनिटांत साध्या पद्धतीने सुनेत्रा पवारांचा शपथविधी सोहळा पार पडला. सुनेत्रा पवार शपथ घेण्यासाठी जात असताना, उपस्थितांकडून अजित दादा अमर रहे, एकच वादा अजितदादा, वहिणीसाहेब आप आगे बढो, हम तुम्हारे साथ है.. अशा घोषणा सभागृहात देण्यात आल्या.

आज दुपारी विधीमंडळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आमदारांची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी आमदारांच्या भावना आणि पक्षाची गरज ओळखून सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडण्यात आला.

दिलीप वळसे पाटील यांच्या प्रस्तावाला छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिले आणि सुनेत्रा वहिनींच्या नावाची विधीमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड झाली. यानंतर तांत्रिक अडचण दूर करण्यासाठी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा खासदारकीचा राजीनामा उपराष्ट्रपतींकडे सुपूर्द केला.

त्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सुनेत्रा पवार यांच्या निवडीचे अधिकृत पत्र दिले. त्यानंतर राज्यपालांच्या संमतीने आज सायंकाळी

## राज्यपालांनी दिली पद आणि गोपनियतेची शपथ
## महाराष्ट्राच्या पहिल्या महिला डीसीएम



विधानभवनात हा ऐतिहासिक शपथविधी सोहळा संध्याकाळी ५ वाजता पार पडला.
दरम्यान, या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बहुतेक सर्व आमदार तसेच या गटाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

### देशातील तिसऱ्या महिला उपमुख्यमंत्री

मध्य प्रदेशातील काँग्रेसच्या जमुनादेवी १९९८-२००३ दरम्यान उपमुख्यमंत्री बनल्या होत्या. त्यानंतर राजस्थानमध्ये कमला बेनीवाल यांनी हे पद २००३ मध्ये भूषवले होते. २००४ ते २००७ अशी तब्बल ४ वर्षे पंजाबमध्ये राजिंदर कौर भट्टल यांनी उपमुख्यमंत्रिपदावर कार्य केले आहे.

१९९९ मध्ये आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेसच्या पुमला पुष्पा श्रीवानी तर बिहारमध्ये भाजपच्या रेणूदेवी यांनीही २०२० ते २०२२ मध्ये उपमुख्यमंत्री म्हणून काम केले आहे. आता १५ डिसेंबर २०२२ पासून राजस्थानात दिया कुमारी भजनलाल सरकारमध्ये कार्यरत आहेत.

प्रवती परिदा १२ जून २०२४ पासून ओडिसा राज्याच्या उपमुख्यमंत्री आहेत. सर्वात तरुण म्हणून पमुला पुष्पा यांनी काम केले आहे. शपथ घेतली त्या वेळी त्या ३३ वर्षांच्या होत्या. तर कमला बेनीवाल यांनी ७६ व्या वर्षी हे पद भूषवले आहे. महाराष्ट्रात सुनेत्रा पवार या देशातील तिसऱ्या उपमुख्यमंत्री असतील.

अजितदादांच्या निधनाच्या चौथ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर आज त्यांना खात्यांचे वाटप करण्यात आले. सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्कासह तीन महत्त्वाची खाती देण्यात आली आहेत. मात्र, अजित पवारांकडील सर्वात प्रभावी मानले जाणारे 'अर्थ आणि नियोजन' खाते सुनेत्रा पवारांकडे न देता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ते स्वतःकडेच ठेवले आहे.

शपथविधीच्या काही वेळानंतरच सुनेत्रा पवारांना राज्य उत्पादन शुल्क हे राज्याच्या तिजोरीत मोठा महसूल मिळवून देणारे खाते मानले जाते. तरुणांशी संबंधित असलेल्या 'क्रीडा आणि युवक कल्याण' खात्याच्या माध्यमातून सुनेत्रा पवार राज्यभरात आपले जाळे विस्तारू शकतात.

### सुनेत्रा पवार यांचा
राजकीय प्रवास



जन्म
18 ऑक्टोबर 1963

कुटुंब
त्यांचे वडील बाजीराव पाटील आणि भाऊ पद्मसिंह पाटील हे दोघेही राजकारणात होते.

- **शिक्षण** : 1983 मध्ये वाणिज्य शाखेतून पदवी प्राप्त केली.
- **लग्न** : 1985 मध्ये अजित पवार यांच्यासोबत लग्न. 2 मुले, पार्थ आणि जय.
- **सामाजिक कार्य:** NGO एन्व्हायर्नमेंटल फोरम इंडियाची स्थापना केली. त्यांनी बारामती हाय-टेक टेक्सटाईल पार्कच्या अध्यक्षा म्हणून काम केले, जे हजारो महिलांना रोजगार देते. त्यांनी विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त आणि पुणे विद्यापीठाच्या सिनेट सदस्या म्हणून काम केले.
- **राजकारणात प्रवेश:** 2024 ची लोकसभा निवडणूक बारामती येथून लढवली. शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्याकडून पराभव. 18 जून 2024 रोजी राज्यसभेवर बिनविरोध निवडून आल्या. आता उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहतील.

### राज्यसभेच्या खासदारकीचा सुनेत्रा पवारांचा राजीनामा

उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यापूर्वी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभेच्या खासदारीचा राजीनामा दिला.

आज दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आमदारांची महत्त्वाची बैठक पार पडली. दिलीप वळसे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, ज्याला छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिले. पक्षाच्या सर्व आमदारांनी या प्रस्तावाचे एकमताने समर्थन केले. या निवडीनंतर सुनेत्रा पवार आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ गटनेत्या म्हणून अधिकृतपणे काम पाहतील.

### राजकीय महत्त्व आणि आव्हाने

सुनेत्रा पवार यांच्या रूपाने महाराष्ट्राला पहिल्या महिला उपमुख्यमंत्री मिळाल्या आहेत. यापूर्वी अनेक महिलांनी राज्याच्या राजकारणात महत्त्वाची पदे भूषवली आहेत, मात्र उपमुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. अजित पवारांची प्रशासनावर असलेली पकड आणि त्यांची कामाची शिस्त सुनेत्रा पवार कशा प्रकारे पुढे नेतात, तसेच आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला कशा प्रकारे नेतृत्व देतात? याकडे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात...

### एसआयआरमधून घुसखोर बाहेर काढले जातील

■ **कोलकाता :** गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बंगालच्या नॉर्थ परगना येथे सांगितले की, ममता सरकार घुसखोरांना संरक्षण देत आहे. बंगालचे लोक तृणमुलला उपटून टाकतील.



त्यांच्या निरोपाची वेळ आली आहे. ममताजींना एसआयआरचा जेवढा विरोध करायचा आहे तेवढा करू द्या. मतदार यादीतून घुसखोरांना काढावेच लागेल. जे घुसखोर उरले असतील, त्यांना भाजपचा मुख्यमंत्री येऊन बाहेर काढेल. वर्ष २०२६ हे तृणमुलला 'टाटा, बाय-बाय' म्हणण्याचे वर्ष आहे.

### रॉन्ग साइड ट्रकचा कहर ५ जणांचा मृत्यू

■ **गंजम :** ओडिशातील गंजम जिल्ह्यातील बेरहमपूर शहरात शनिवारी एका भयानक रस्ते अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला.

हल्दियापदर चौकाजवळ राष्ट्रीय महामार्गावर हा अपघात झाला, जिथे रस्त्याच्या चुकीच्या बाजूने येणाऱ्या एका भरधाव ट्रकने तीन मोटारसायकलींना धडक दिली. या भीषण अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, ट्रक राष्ट्रीय महामार्गाच्या चुकीच्या बाजूने जात होता आणि एकामागून एक तीन मोटारसायकलींना धडकला. ट्रकने अनेकांना चिरडले. पाच जणांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातामुळे घटनास्थळी गोंधळ उडाला. मृतदेह रस्त्यावर विखुरलेले होते आणि महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

## राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार होते...

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१ :



महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणावर शरद पवारांनी म्हटले, ही अजित पवारांचीही इच्छा होती. ती नक्कीच पूर्ण व्हायला हवी. शरद पवार म्हणाले की अजित, शशिकांत शिंदे आणि जयंत पाटील यांनी दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू केली होती.

त्यांनी सांगितले की विलीनीकरणाची तारीखही निश्चित झाली होती. १२ फेब्रुवारीला विलीनीकरणाची घोषणा होणार होती, पण दुर्दैवाने, अजित त्याआधीच आम्हाला सोडून गेले. शरद पवारांच्या विधानावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) नेते प्रमोद हिंदुराव म्हणाले, ते आमचे ज्येष्ठ नेते आहेत. मी त्यांच्याबद्दल जास्त काही बोलू शकत नाही, पण मला वाटते की येत्या काळात सर्व पक्ष एकत्र काम करतील.

खरं तर अजित यांनी १७ जानेवारी रोजी बारामतीमध्ये शरद पवारांची भेट घेतली होती. भेटीदरम्यान दोन्ही पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांनी बारामती कृषी प्रदर्शन, जिल्हा परिषदेच्या निवडणुकांबद्दल चर्चा केली. एकत्र येण्यावर कोणतीही चर्चा झाली नाही.

शरद पवार म्हणाले, या सर्व चर्चा इथे होत नाहीत, त्या मुंबईत होत आहेत. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि इतर ज्येष्ठ नेते या चर्चा करत आहेत. जे काही दिसत आहे, त्यावरून असे वाटते की हे निर्णय त्यांच्याकडूनच घेतले गेले आहेत.

उपमुख्यमंत्री पदासाठी सुनेत्रा पवार यांचे नाव दिल्याची मला कोणतीही माहिती नाही. त्यांच्या पक्षाने निर्णय घेतला असेल. मी आज वर्तमानपत्रात पाहिले.

प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांसारखी काही नावे आहेत ज्यांनी काही निर्णय घेण्याचा पुढाकार घेतला आहे. जर कुटुंबात काही समस्या असेल, तर कुटुंब एकजूट राहते. कुटुंबात कोणतीही समस्या नाही. शरदपवार यांच्या वक्तव्यावरून अनेक अर्थ काढले जात आहेत.

## मला काहीही माहिती नाही...
### शपथविधीवर सुप्रिया सुळेंची प्रतिक्रिया

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१ :



आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या घडामोडींवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली.

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत आणि सुनेत्रा पवारांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या शपथविधीबाबत बोलताना सुप्रिया सुळेंनी अगदी मोजक्या शब्दांत प्रतिक्रिया दिली. मला यातलं काहीही माहिती नाही, असं म्हणत सुप्रिया सुळेंनी अधिक बोलणं टाळलं.

उद्या संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. त्यामुळे मला दिल्लीला जावं लागत आहे. आता माझी फ्लाईट असून मी दिल्लीला चालले आहे. कारण मी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची सभागृह नेता असल्यामुळे मला दिल्लीला जावं लागत आहे, त्यांचा शपथविधी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाचे विलीनीकरण याविषयी मला यातलं काहीही माहिती नसल्याचे त्या म्हणाल्या.

## माणसापेक्षा खुर्ची महत्त्वाची

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :



राजकारणात गेल्या दोन दिवसांमध्ये ज्या घडामोडी पाहिल्या यामुळे असे वाटते की माणसापेक्षा खुर्चीला जास्त महत्त्व आहे. राजकारणामध्ये खुर्ची जिंकलेली आहे, सार्वजनिक जीवनातही खुर्चीच जिंकली आणि माणूस हरल्याचे चित्र दिसून येत आहे. सर्व सामान्य माणसांना या गोष्टी भावत नाहीत, शासकीय दुखवटा संपण्यापूर्वी हे सर्व निर्णय व्हायला नको होत असे मला वाटते, असे शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

राजकारणातील घडामोडीमध्ये शरद पवारांना विचारले गेले नसावे. पक्षातील नेत्यांनी आणि राजकीय सल्लागारांनी घेतलेला हा निर्णय शरद पवारांना याबद्दल कितपत माहिती आहे हे सांगणे शक्य नाही, असेही संजय शिरसाट म्हणाले.

## मढ्याच्या टाळूवरचं लोणी खाण्याचा प्रकार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :

सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबद्दल कुणालाच काही माहिती नाही, हा त्यांचा पक्षाचा अंतर्गत विषय आहे. त्याबद्दल शरद पवार बोलले ते अगदी योग्य आहे. शिंदे आणि अजित पवार यांचा गट हा भाजपच्या गभार्तून आलेली पिल्ल आहेत, ते अमित शहा यांचे पक्ष आहेत, त्यामुळे त्यांचा काय निर्णय घ्यायचा तो अमित शहा आणि भाजपच्या भूमिकेवर ठरेल, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.



संजय राऊत म्हणाले की, राज्याला महिला उपमुख्यमंत्री मिळणार अशा बातम्या मी ऐकत आहे. सुनेत्रा पवारांना हे पद मिळणार असल्याच्या बातम्या आम्हीही ऐकतो आहोत, हा त्यांचा पक्षाचा निर्णय आहे त्यावर आम्ही काय बोलणार. पण अजूनही महाराष्ट्र अजित पवार यांच्या जाण्याने दुःखातून सावरलेला नाही एवढंच मी सांगू शकतो.

अजित पवार यांच्या कुटुंबातील कोणी भाजपच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री होणार असेल तर तो त्यांच्या पक्षाचा आणि कौटुंबिक निर्णय आहे. यावर कुणी इतराने मत व्यक्त करण्याची ही वेळ नाही, असेही संजय राऊत यावेळी म्हणाले.

## ९ हजार कोटींची मालमत्ता असलेल्या उद्योजकाची आत्महत्या

■ वृत्तसंस्था, बेंगळुरू, दि. ३१ :
कॉन्फिडेंट ग्रुपचे अध्यक्ष सीजे रॉय यांनी शुक्रवारी सेंट्रल बेंगळुरूमध्ये रिचमंड सर्कलजवळ असलेल्या कंपनीच्या कार्यालयात स्वतःला गोळी मारून आत्महत्या केली.

पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना दुपारी सुमारे ३.१५ वाजता घडली. त्यांनी सांगितले की, गेल्या तीन दिवसांपासून आयकर विभागाची तपासणी सुरू होती. आत्महत्येनंतर आयकर अधिकारी घटनास्थळावरून निघून गेले.

रॉय यांची एकूण संपत्ती ९ हजार कोटी रुपये होती. त्यांच्याकडे खाजगी जेट आणि २०० हून अधिक आलिशान गाड्या होत्या, त्यापैकी १२ रॉल्स रॉयस होत्या. मूळचे केरळचे असलेले रॉय

### प्रायव्हेट जेट आणि २०० हून अधिक गाड्यांचे मालक




यांचा व्यवसाय कर्नाटक आणि दुबईमध्ये पसरलेला होता. कॉन्फिडेंट ग्रुप केरळ आणि कर्नाटकचा रिअल इस्टेट डेव्हलपर आहे. पोलीस तपास करत आहेत.



महासागर

•रविवार,दि.१ फेब्रुवारी २०२६

अकोला


पान ३

# विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा १६ फेब्रुवारीपासून

**अकोला :** क्रीडा, सांस्कृतिक, आविष्कार, आव्हान, उत्कर्ष अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी प्रमाणित संबंधित केलेल्या विद्यार्थ्यांच्या हिवाळी - २०२५ विद्यापीठीय पर्यायी परीक्षांचे वेळापत्रक परीक्षा विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.. १६ फेब्रुवारीपासून या परीक्षा घेण्यात येणार आहेत. सर्वसंबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून करण्यात आले आहे. जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा ही विद्याभारती महाविद्यालय (केंद्र क्र. १२६), अकोला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२०५), बुलढाणा जिल्हा विद्यार्थी जी. एस. कॉलेज. खामगाव (३०१ ), यवतमाळ जिल्हा विद्यार्थी परीक्षा अमोलकचंद कॉलेज, यवतमाळ (४०१), वाशिम जिल्हा विद्यार्थी परीक्षा आर. ए. कॉलेज, वाशिम (७०१ ) आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ही त्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावरील नमूद परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. एन.ई.पी. स्नातक अभ्यासक्रमाच्या काही व्हर्टिकल्सच्या परीक्षा या महाविद्यालयीन स्तरावर असल्यामुळे सर्वसंबंधित महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांनी पर्यायी परीक्षेसाठी अग्रेषित केलेत आणि संबंधित संचालक यांनी परीक्षा विभागाकडे पर्यायी परीक्षेकरिता शिफारस केली आहे. यासंदर्भात सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळिवण्यात आले असून म हाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी.

## थोडक्यात

### अकोटात वैष्णवांच्या मांदियाळीत साजरा होणार श्रींचा प्रगट दिन



**अकोट:** स्थानिक अकोट येथे गजानन नगर येथील गजानन महाराज मंदिर येथे श्रीच्या प्रगट दिनानिमित्त वारकरी संप्रदाय परंपरेनुसार सात दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह भाविकांच्या उपस्थिती मध्ये साजरा होत असून सात दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. ज्ञानेश्वर म हाराज पातोंड यांच्या वाणीतून श्रीमद भागवत कथा वाचन होत असून दररोज काकडा,अभिषेक,गजानन विजय ग्रंथ पारायण,हरिपाठ,कीर्तन आदी कार्यक्रम संपन्न होत असून नागरिकांनी या महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### बाजार वसुली निविदेकडे कंत्राटदारांची पाठ

**अकोला :** महापालिकेच्या वतीने शहरातील रस्त्यालगत आणि निश्चित केलेल्या जागेवर व्यवसाय करणाऱ्यांकडून दररोज बाजार शुल्क आकारले जाते. मात्र, महापालिकेने या बाजार वसुलीच्या ठेक्यासाठी प्रसिद्ध केलेल्या निविदांना कंत्राटदारांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. ३१ डिसेंबर रोजी स्वाती कंपनीचा ठेका रद्द झाल्यापासून बाजार वसुलीची जबाबदारी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे. परंतु शहराचे १२४ चौरस किलोमीटरचे विस्तीर्ण क्षेत्रफळ पाहता अवघ्या सहा कर्मचाऱ्यांच्या बळावर ही वसुली करणे अशक्य होत असून, परिणामी महापालिकेच्या तिजोरीत अल्प रकम जमा होत आहे. पूर्वी १० ते १५ रुपये असलेले बाजार शुल्क वाढवण्याचा निर्णय प्रशासनाने समि ती गठित करून घेतला होता. समि तीने शुल्कात दुप्पट वाढ केल्याने निविदेची मूळ रक्कम दोन कोटी रुपये अकोला जनहित सर्वतोपरी निश्चित करण्यात आली होती. मात्र, वाढीव रकमेमुळे कंत्राटदारांनी या प्रक्रियेकडे पाठ फिरवली. सलग तीन वेळा निविदा प्रसिद्ध करूनही एकही अर्ज प्राप्त न झाल्याने अखेर प्रशासनाने निविदेची रक्कम दोन कोटींवरून दीड कोटी रुपयांपर्यंत खाली आणली. तरीही या निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने आता पुन्हा एकदा नवीन निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. वारंवार प्रक्रिया राबवूनही कंत्राटदार पुढे येत नसल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असून, आगामी काळात ही रक्कम आणखी कमी केली जाणार की पुन्हा निविदा काढल्या जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अज्ञात पुरुषाचा रेल्वेने चिरडून मृत्यु

अकोला : गायगाव अकोला येथे खाली जाणाऱ्या रेल्वे मार्गावर एका अज्ञात पुरुषाचा रेल्वेने चिरडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी डाबकी रोड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. खाली जाणाऱ्या गाडीचे रेल्वे चालक राजेश्वर प्रसाद यांनी संपर्क यंत्रणेद्वारे की.मी. ५७५/०८ या ठिकाणी एका अज्ञात व्यक्तीचा रेल्वे अपघात झाल्याची माहिती दिली.

# विश्वकर्मा जयंतीदिनी देश सुजलाम सुफलाम बनविणे हाच संकल्प : आ. रणधीर सावरकर



**▪अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)▪**

सृष्टी रचनेमध्ये ब्रह्मदेवा सोबत विश्वकर्मा यांची महत्त्वपूर्ण भूमिका असून विश्वकर्मा चा सन्मान करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वकर्मा योजना सुरू करून १८ पगड जाती बारा बलुदारांचा सन्मान केला तसेच त्यांच्या कल्याणासाठी महत्त्वकांक्षी योजना सुरू करू घरेलू उद्योगांना चालना दिली भगवान विश्वकर्मा यांच्या जयंती निमित्य समाजातील सर्व विश्वकर्मा कर्मा यांना नमन करणे त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेणे आणि देश सुजलाम सुफलाम बनवणे हीच खरी विश्वकर्मा जयंती निमित्त संकल्प असल्याचे प्रतिपादन आमदार रणधीर सावरकर यांनी केले. विश्वकर्मा जयंती निमित्त उमरी येथील विश्वकर्मा मंदिरात जाऊन विशेष पूजा अर्चना भारतीय जनता पक्षाच्या वतीने करून समाजातील कामगार वेगवेगळ्या क्षेत्रातील कारागीर यांचा सन्मान करून त्यांचा गौरव करून त्यांना विश्वकर्मा जयंतीच्या शुभेच्छा भाजपातर्फे त्यांनी दिल्या. यावेळी भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने, विजय अग्रवाल, महापौर शारदाताई खेडकर, उपमहापौर अमोल गोगे , पवन महल्ले, विवेक भरणे, पल्लवी मोरे, वारोकारताई, मिलिंद राऊत, माधव मानकर, गिरीश जोशी, संजय जोशी, संतोष बाभुळकर, एडवोकेट देव आशिष काकड, सजयगोटफफोडे , अंबादास उमाळे, उदय थोरात, डॉक्टर अमित कावरे, शंकरराव वाकोडे, राजेश बेले, अनिल गावंडे, केशव पोतदार, केशव हेडा, निलेश काकड, सागर कावरे प्रशांत अग्रवाल प्रशांत अवचार, अजय शर्मा उपस्थित होते.

# अवैध वीटभट्टयांच्या प्रदूषणाने नागरिक त्रस्त

## श्वसन अन् फुफ्फुसांच्या आजारात वाढ

**▪अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)▪**

बाळापूर शहर व परिसरातील नागरी वस्तीत सुरू असलेल्या अवैध वीटभट्ट्यांमुळे निर्माण होणाऱ्या धूळ व धुराच्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या तक्रारींमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. दमा, श्वसनविकार, फुप्फुसांचे आजार तसेच त्वचारोगांचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढल्याची चिंता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. बाळापूर शहर व ग्रामीण भागात प्रदूषण नियंत्रण मंडळाने केवळ २ वीटभट्ट्यांना परवानगी दिली असताना, प्रत्यक्षात शेकडो वीटभट्ट्या नियमांची पायमल्ली करत सुरू असल्याचा आरोप होत आहे. लोकवस्तीपासून किमान १०० मीटर अंतर, महामार्ग व मुख्य रस्त्यांपासून दूर अंतर तसेच नगर परिषद किंवा ग्रामपंचायतीची 'ना हरकत' आवश्यक असतानाही अनेक भट्ट्या थेट शाळा, वस्ती व रस्त्यालगत सुरू असल्याचे चित्र आहे. याबाबत कोणतेही अधिकृत अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर न झाल्याने महसूल व संबंधित प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. बाळापूरमध्ये अवैध वीटभट्ट्यांच्या प्रदूषणाने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे.हरित लवादाने घातलेल्या निर्बंधांना धाब्यावर बसविण्यात आले आहे. हरित लवादाने मातीपासून लाल विटा तयार करण्यावर निर्बंध घातले असतानाही, गौण खनिज मातीचा व



शासकीय जागेचा वापर सुरू असून, करही भरला जात नसल्याचे सांगितले जाते. वीटभट्ट्यांसाठी म ाती व राख वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे रस्त्यांवर प्रचंड धूळ उडत असून,नागरिकांच्या डोळ्यांना इजा व श्वसनास त्रास होत आहे. या वीट भट्टीम ध्ये कच्च्या विटा भाजण्यासाठी मोठ्या प्रमाणावर हिरवी झाडे, लाकूड व शेणाच्या गोवऱ्यांचा वापर होत असल्याने शहरावर धुराचे आच्छादन दिसून येत आहे. सायंकाळी श्वास घेणे कठीण होत असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# माता चैतन्य मीरा यांच्या भागवत कथेची सुदामा मिलनाने भक्तीभावात पूर्णाहुती

**▪अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)▪**

स्थानीय गोरक्षण रोड परिसरातील गोरक्षण संस्थान येथे सुरू असलेल्या पूज्य माता चैतन्य मीरा यांच्या श्रीमदब भागवत ज्ञानयज्ञ कथेचे शनिवारी सुदामा मिलन झाकी ने भक्तीभावात समापन झाले.श्री गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृति प्रचार परिषद आणि श्री भागवत सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माता चैतन्य मीरा यांनी दि २५ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत आयोजित आपल्या संगीतमय भागवत कथेत अनेक प्रसंग साकारत भागवताची महिमा विशद केली.आपल्या अंतिम सत्रात राधा कृष्णाची झाकीमय कथा सांगितली.संपूर्ण कृष्ण चरित्र प्रतिपादित केल्यावर पूर्णाहुती दरम्यान सुदामा व द्वारकाधीश मिलनाची विरहयुक्त कथा सांगितली.या कथेत द्वारकाधीश व सुदामाची अति सुंदर झाकी सादर करण्यात आली.यावेळी या झाकीचे भव्य स्वागत करण्यात येऊन भाविकांनी झाकी दर्शन घेतले.यात





कृष्णाची भूमिका सौ उर्वशी पियुष कुराणी यांनी तर रुक्मिणीची भूमिका मिताली राठी यांनी व सुदामाची भूमिका विजय खंडाळकर यांनी साकारली.यावेळी सुप्रभात सत्संग मंडळाने मातेचे स्वागत केले.

# स्वच्छ मुर्तिजापूर, सुंदर मुर्तिजापूर संकल्प साकारण्यासाठी नगरपरिषद कटिबद्ध - नगराध्यक्ष हर्षल साबळे

**▪मुर्तिजापुर,दि.३१ (प्रतिनिधी)▪**

मुर्तिजापूर शहराला स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी माननीय आमदार हरिष पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही कटिबद्ध आहोत. याच अनुषंगाने काल दि.३०/०१/२०२६ शुक्रवार रोजी नगरपरिषद येथे शहरातील सर्व सफाई कामगारांची महत्त्वपूर्ण बैठक घेतली. मुर्तीजापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही प्रयत्नशील असून नागरिकांनी सुद्धा स्वच्छता मोहीमेत सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी केले. या बैठकीला नगराध्यक्ष हर्षल रामेश्वर साबळे, मुख्याधिकारी निलेश जाधव, उपनगराध्यक्ष रोहित अव्वलवार, गटनेते गजानन नाकट, आरोग्य सभापती सौ.पूनम रवी माडकर सह समस्त कर्मचारी आणि सफाई कामगारांची उपस्थिती होती.नियोजनबद्ध स्वच्छता: शहराच्या स्वच्छतेचे सूक्ष्म नियोजन करण्यासाठी प्रत्येक वॉर्डसाठी विशेष 'वारसा शिपाई' यांची नियुक्ती करण्यात आली.काम ात सुसूत्रता: स्वच्छतेचा दर्जा सुधारण्यासाठी वॉर्डनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले.

# स्व. अजित पवार यांना सर्वपक्षीय सामूहिक श्रद्धांजली अर्पण






**▪अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)▪**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

स्थानिक पोलीस लॉंन येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष माजी महापौर मदन भरगड यांनी आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत माजी मंत्री अजहर हुसैन, आमदार साजिद पठाण,माजी आमदार बबन चौधरी,माजी आमदार गव्हाणकर,सौ प्रतिभा अवचार,संदीप कुलट,सचिन शिंदे,रमेश बजाज,आझाद खान,फरीद भाई,अजय तापडिया,राजकुमार मूलचंदानी,योगेश अग्रवाल,डॉ. चंद्रकांत पनपालिया, संजय चौधरी,आशा मिरगे,डॉ धनंजय नालट,पंकज साबळे,राजेश काळे,धनंजय मिश्रा,निखिलेश दिवेकर,नरेंद्र देशमुख, दिलीप आसरे,कैलास इंगळे,कैलास तिवारी,दुर्गासिंग ठाकूर,नरेंद्र मुदिराज,संतोष उटाले,विजय उजवणे,तश्वर पटेल, दीपक माने,पवन गवई,इमरान सिद्दीकी, राजेंद्र चितलांगे,गणेश कटारे,अभिषेक भरगड,सुनील पसारी,सूरज भरगड,पवन खंडेलवाल आदि उपस्थित होते. प्रदीप खंडेलवाल, राजू शर्मा,मनोज खंडेलवाल,बाळू पाटील,रवी पत्रो डीया,बबलू शेख,प्रा जमिल अहमदसर,गणेश काळोया, सुभाष शर्मा,परेश जोगी,विनोद अग्रवाल, आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# अंध मातेच्या मुलीवर लैंगिक अत्याचार, आरोपीचा जामीन फेटाळला

**▪अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)▪**

एका असहाय्य, अंध आणि वेडसर महिलेच्या अल्पवयीन मुलीवर तिचा सख्खा बाप, काका आणि शेजाऱ्याने वारंवार अत्याचार केल्याच्या धक्कादायक प्रकरणात आकोट न्यायालयाने कडक पवित्रा घेतला आहे. या प्रकरणातील ६८ वर्षीय आरोपी गजानन जयदेव भोम याचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

शाळेतील समुपदेशनात फुटली वाचा: हा संतापजनक प्रकार तेव्हा उघडकीस आला, जेव्हा पीडितेच्या शाळेत गुड टच आणि बॅड टच या विषयावर समुपदेशन सुरू होते. यावेळी या बारा वर्षीय मुलीने आपल्यावर होणाऱ्या अमानुष अत्याचाराची माहिती शिक्षकांना दिली. पीडितेची आई अंघ शाळेच्या आणि मानसिकदृष्ट्या विचलित असल्याने, तिचा फायदा घेत तिचा बाप, काका आणि शेजारी आबा (गजानन भोम) हे तिघेही तिच्यावर सतत अत्याचार करत होते. न्यायालयीन कारवाई : मुख्याध्यापकांनी ही माहिती बालकल्याण समितीला दिली, त्यानंतर तेल्हारा पोलिसांनी आरोपींविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. २५ डिसेंबर

२०२५ पासून हे सर्व आरोपी अकोला कारागृहात आहेत. यातील आरोपी गजानन भोम याने जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र, सरकारी वकील अजित देशमुख यांनी या अर्जाला कडाडून विरोध केला. जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी गुन्ह्याचे स्वरूप आणि सामाजिक गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला.

# जीवनात भगवतीचे अधिष्ठान ठेवा:पु अंबरीश महाराज

## केशवनगरच्या श्रीमद देवी भागवत कथेस भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**▪अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)▪**

यथार्थ जीवनात सदगुरूच्या कृपेची आवश्यकता प्रत्येकाला असते. सदगुरू जवळ बसल्यावर नेहमी भागवत चर्चा केली पाहिजे. सदगुरू शिवाय सदगती मिळणे शक्य नाही. सदगुरूच्या माध्यमातूनच भगवतीचे अधिष्ठान जीवनात निर्माण होऊन शाश्वत सुख व आदीमायेची कृपा प्राप्त होऊन जीवन धन्य होत असल्याचा हितोपदेश भागवताचार्य पू अंबरीश महाराज जोशी यांनी केला.श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ, संभाजीनगर संचालित श्री जगदंब परिवार अकोलाच्या वतीने स्थानीय केशवनगर परिसरातील श्री मारुती मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या श्रीमदब देवी भागवत सप्ताहात भागवताचार्य पू अंबरीश महाराज जोशी सोनईकर यांनी देवी भागवतच्या अनुषंगाने सदगुरू चे महत्व प्रतिपादित केले. ते म्हणाले, आपण कितीही ज्ञानी असलो तरी सदगुरु शिवाय खरे ज्ञान हे प्राप्त होऊ शकत नाही. सदगुरू शिवाय मिळालेले ज्ञान हे आंधळे असते.

सदगुरू हे जीवनाचा कायापालट करतात. म्हणून सदगुरूला अनन्यभावाने शरण जाऊ सकारात्मक दृष्टी आपल्या अंगी निर्माण करण्याच्या हितोपदेश त्यांनी यावेळी केला. ते म्हणाले,वास्तविक ज्ञानाची प्राप्ती ही सद्गुरूच्या कृपेने प्राप्त होते. सदगुरू हे भक्तांच्या जीवनात भगवतीच्या अधिष्ठानाची निर्मिती करून भक्ताला खरा मार्ग दाखवतात. देवी भागवताच्या अनुषंगाने नैमिषारण्यात हाच उपदेश ऋषीमुनींनी प्रतिपादित केला असल्याचे सांगून त्यांनी यावेळी देवी भागवताच्या अनुषंगाने आदीमायेची चर्चा केली. सत्र प्रारंभी पूज्य महाराजांची सहधर्मचारीनी भागवत निरूपणकार सौ राजेश्वरी ताई यांचे महिला मंडळाच्या वतीने पूजन करण्यात आले. तर ग्रंथ पूजन शामभाऊ वानखडे यांनी केले.

पूज्य अंबरीश महाराज यांचे स्वागत प्रदीप कुलकर्णी, सुनील कुरेकर, विवेक बोंडे, मिलिंद भागवत व जगदंब परिवाराच्या कार्यकर्त्यांनी केले.संचालन शैलेशराव देशमुख यांनी केले.दिनांक २ फेब्रुवारी पर्यंत नित्य सायं ५-३० ते रात्री ८ वाजेपर्यंत आयोजित या देवीभागवत कथेचा समस्त भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन आयोजका तर्फे करण्यात आले आहे.

### लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघातर्फे

# स्व. अजितदादा पवार यांचे श्रद्धांजली साठी सभा

**▪अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)▪**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता अ. भा. लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघातर्फे आज रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता एका शोक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक जठार पेठ परिसरातील जनता बँकेच्या बाजूला जैन रेष्ट्रो येथे ही सभा होईल.



याप्रसंगी लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख यांचे सह राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार प्रदीप खाडे, प्रा. डॉ. संतोष हुशे, ज्येष्ठ साहित्यिक पुष्पराज गावंडे, प्रा. प्रकाश डवले, राष्ट्रवादीच्या मंदाताई देशमुख, कृष्णा भाऊ अंधारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी लोक स्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे सर्व पदाधिकारी,, विचार मंथन चे सभासद, स्नेही जन व इतरही पत्रकार बंधू-भगिनींनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# सिकलसेल विशेष अभियानाचा प्रचार

## कान्हेरी येथे नर्सिंग विद्यार्थ्यांमार्फत जनजागृती

■अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)■

जिल्ह्यात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली अरुणोदय सिकलसेल विशेष अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत झिरो ते ४० वर्षे वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी करण्यात येत असून १०० टक्के तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.या मोहिमेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी विविध शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी, धर्मगुरू तसेच खेळाडू यांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

याचाच एक भाग म्हणून दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी मौजे कान्हेरी, तालुका बार्शी टाकळी, जिल्हा अकोला येथे लेट पांडुरंग पाटील नर्सिंग स्कूल अँड कॉलेज, कान्हेरी येथे विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या



कार्यक्रमात नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना अरुणोदय सिकलसेल मोहिमेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून सिकलसेल आजाराबाबत समाजामध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. या पथनाट्याम धून लग्नापूर्वी सिकलसेल तपासणी करणे आवश्यक आहे हा महत्त्वाचा संदेश देण्यात आला. तसेच सोशल मीडियाच्या माध्यम ातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत हा संदेश पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले.या मोहिमेअंतर्गत दिनांक १५ जानेवारी ते ७ फ ेब्रुवारी २०२६ या कालावधीत गावोगावी जाऊन आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत सिकलसेल तपासणी व निदान करण्यात येत असून, आजार आढळून आलेल्या रुग्णांवर त्वरित उपचार सुरू करण्यात येत आहेत.

# खदान पोलिसांची अवैध दारु अड्ड्यांवर कारवाई

■अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)■

शहरातील खदान पोलिसांनी अवैध दारू व्यवसायावर मोठी कारवाई करत २ दिवसात २ वेगवेगळ्या २ ठिकाणी छापे टाकून २ लाख ४३ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे अवैध दारूविक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, मलकापूर रेल्वेगेट परिसरात मोपेडवरून अवैध देशी दारूची वाहतूक सुरू असल्याची माहिती खदान पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत दोन वाहनांवरून दारू वाहतूक करणाऱ्या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून 'संत्रा' देशी दारूचे २ बॉक्स (९६ सीलबंद बाटल्या ), 'गुलाबी संत्रा' देशी दारूचे ३ बॉक्स (१४४ सीलबंद बाटल्या ) असा दारूसाठा जप्त करण्यात आला. दोन्ही मोपेड, प्रत्येकी किंमत अंदाजे ७५ हजार रुपये व दारू, असा एकूण १ लाख ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



खदान पोलिसांनी २ दिवसांत केलेल्या कारवायांमध्ये एकूण २.४३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, शहर व ग्रामीण भागातील अवैध दारू व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली.कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेही यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलिस निरीक्षक केदारेसह संजय वानखडे, नीलेश खंडारे, अमित दुबे, गिरीश वीर आणि खदान पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.यापूर्वी खदान पोलिसांनी ग्राम चांदूर शिवारातील नदीकाठ परिसरात सुरू असलेल्या गावराण हातभट्टीवर छापा टाकला. या कारवाईत हातभट्टीची दारू तसेच दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले.

# भाजपा ही धनाजी-संताजीसारखी ताकद, विरोधकांना सतत दिसते : जयंत मसने

■अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)■

लोकशाहीत जनतेने दिलेला स्पष्ट कौल मान्य न करता काँग्रेस व उबाठा सेनेचे नेते सातत्याने बिनबुडाचे व बेछूट आरोप करत आहेत. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा अपमान करणारी ही भूमिका म्हणजे पराभव न पचल्याची लक्षणे असून, अकोलेकर जनता हा अपमान कधीही सहन करणार नाही, असा कडवट इशारा भाजप महानगर अध्यक्ष जयंत मसने यांनी दिला. भाजपाचे नेते विरोधकांना धनाजी-संताजीसारखे सतत दिसत असून, पराभवामुळे हताश व नैराश्यग्रस्त झालेले काही नेते पिण्याच्या पाण्यातही भाजपा पाहत असल्याची टीका त्यांनी केली. आत्मचिंतन न करता ‟मेरी मुर्गी की एक टांग" या भूमिकेतून आरोप करणे म्हणजे लोकशाहीची थट्टा असल्याचे त्यांनी सांगितले.

जयंत मसने यांनी सांगितले की, राजराजेश्वर नगरी अकोला येथील जनतेने भारतीय जनता पक्षावर विश्वास व्यक्त करत ३८ जागांवर भाजपाला तर महायुतीचे एकूण ४१ नगरसेवक विजयी केले आहेत. असे असतानाही लोकशाहीचा व जनादेशाचा अवमान करणारे आरोप केले जात आहेत. अकोल्याच्या करप्रणाली संदर्भात सुप्रीम कोर्टात काँग्रेसने धाव घेतल्यानंतरही न्यायालयाचा निर्णय न मानता अपप्रचार करण्यात आला; तरीही जनतेने भाजपालाच सर्वाधिक जागा दिल्या, हे वास्तव असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मतदारांनी दिलेला स्पष्ट जनादेश मान्य नसल्यामुळेच अशा प्रकारचे आरोप केले जात असल्याचा आरोप करत, भाजपा ही ताकद आहे, जी धनाजी-संताजीसारखी विरोधकांना सतत दिसत राहील, असा विश्वास जयंत मसने यांनी व्यक्त केला.

# मुर्तिजापुर येथे बनावट उत्पादनेविक्री,दोघांवर गुन्हा दाखल

मुर्तिजापुर : शहरात बनावट स्वच्छता साहित्य खरे असल्याचे भासवून विक्री केल्याप्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलिस ठाण्यात २ दुकानदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई गुरुवारी (दि. २९) रात्रीच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी अल्ताफ रोशन शेख (५१), व्यवसाय सिनीयर मॅनेजर तसेच ॲडव्होकेट व सॉलिसिटर ( रा. नागपूर), सध्या नोएडा यांनी फिर्याद दिली.फिर्यादीच्या माहितीनुसार, लक्कडगंज येथील भगतसिंग चौक परिसरातील दुकानांमध्ये रेककिट कंपनीच्या हार्पिक व कॉलिन स्प्रेची बनावट उत्पादने खऱ्या मालासारखी विकली जात असल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यावरून पोलिस व फिर्यादी यांनी पंचांसह आरोपींच्या दुकानांवर छापा टाकला. आरोपी आकाश राजपाल (३४), रा. समतानगर, मूर्तिजापूर यांच्याकडून हार्पिक पॉवर प्लस १० एक्स ॲडव्हान्सच्या १हजार मिलीच्या ३ बाटल्या, ५०० मिलीच्या ८ बाटल्या तसेच कॉलिन स्प्रेच्या २ बाटल्या असा एकूण १ हजार ८१५ रुपयांचा बनावट माल जप्त करण्यात आला.

# अजित पवारांना अकोटमध्ये सर्वपक्षीय श्रद्धांजली



■अकोट,दि.३१ (प्रतिनिधी)■

स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांना दुपारी पाच वाजता सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात आली. अकोट तालुक्यातील सर्वच प्रमुख पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी श्रद्धांजली करिता आपली उपस्थिती दर्शविली होती. त्यामध्ये सर्वच राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी स्वर्गीय अजित पवारांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थितांना अजित पवारांच्या कार्यपद्धतीवर तसेच आपले अनुभव सांगत श्रद्धांजली पर मनोगत व्यक्त केले. सर्व पक्षीय श्रद्धांजलीपर कार्यक्रमास भाजप, काँग्रेस, शिवसेना उबठा गट, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, वंचित बहुजन आघाडी, प्रहार जनशक्ती पक्ष, कृषी उपन्न बाजार समितीसह तालुक्यातील अनेक सामाजिक संघटनांनी सुद्धा श्रद्धांजली वाहण्यात आली. सर्व पक्षीय श्रद्धांजली कार्यक्रमाचे संचालन डॉ गोपाल राठोड यांनी केले.

### पाटील समाज वधू सूचक मंडळाच्या वतीने

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

■अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)■

स्थानिक वानखडे नगर करता हनुमान मंडळ येथे राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री दिग्गज मराठा नेतृत्व स्वर्गीय अजित दादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन कर्ता हनुमान मंडळ व पाटील समाज वधू सूचक मंडळाच्या वतीने करण्यात आले होते यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्री अशोकराव अम ानकर,आपला माणूस डॉ अशोक ओळंबे, प. स सदस्य योगेश्वर वानखडे, सामाजिक कार्यकर्ते प्रा गणेश कावरे, ह भ प शिवाजी महाराज अमृतकर, माजी सैनिक सुभाष पाटील म्हैसने, अड संतोष गोळे, माजी नगरसेवक राजु काळे,विनायक पवार, संजय सूर्यवंशी, दिनकरराव सरप, योगेश थोरात, हभप विलास महाराज म्हैसने, डॉ तेजराव नराजे रामरतन बुडूकले, विनायक धोरण, संजय इंगळे, दिनकरराव घोडेराव



शरद वानखडे, नंदकिशोर गावंडे, सुनील उंबरकर, गजानन गोलाईत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती यावेळी श्री अशोकराव अमानकर,आपला माणूस डॉ अशोक ओळंबे, प. स सदस्य योगेश्वर वानखडे, सामाजिक कार्यकर्ते प्रा गणेश कावरे, ह भ प शिवाजी महाराज अमृतकर, माजी सैनिक सुभाष पाटील म्हैसने, अड संतोष गोळे, माजी नगरसेवक राजु काळे यांनी राज्याचे अष्टपैलू नेतृत्व निर्भीड लोकहितकारी शेतकऱ्यांचे कैवारी, मराठा समाज भूषण, लाडक्या बहिणींचा भाऊ, वेळेचे योग्य नियोजन करणारे, अधिकाऱ्यांच्या आधी प्रत्येक कार्यक्रमाला उपस्थित राहून समाजहित जोपासणारे मिस्किल तसेच खंबीर नेतृत्व यांचे अपघाती निधनाने समाजाचे तसेच राज्यातील जनतेचे न भरून येणारी हानी झाली असून असा नेता होणे नाही अश्या शब्दात श्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली उर्पण केली.

## थोडक्यात

### दुर्गवाडा येथे सिकलसेल तपासणी मोहीमेस शुभारंभ



**मूर्तिजापूर :** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने १५ जानेवारी ते ७ फ 'ब्रुवारी या कालावधीत 'अरुणोदय सिकलसेल अनेमीया विषेश अभियान राबवले जात आहे. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाडवे, यांच्या सुचनेनुसार व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुधीर कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रा. आ. केन्द्र पारद येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. दामले साहेब व डॉ. सिरसाट यांच्या काटेकोर नियोजन व अंमलबजावणी खाली वरील अभियाना अर्तंगत तपासणी मोहिमेचा शुभारंभ आयुष्यमान आरोग्य मंदिर दुर्गवाडा येथे सरपंच संतोष गवई यांच्या उपस्थितीत करण्यात आला. उपकेंद्र अंर्तगत येत असलेल्या सर्व गावात व शाळेत ० ते ४० वयोगटातील ऑनलाईन नोंदवलेल्या लाभार्थ्यांना बोलवून, आरोग्य सेविका ज्योती सुरडकर (डाहाके) यांनी सदंर्भ सेवा दिली. सिकलसेल हा अनुवांशिक आजार असुन, कोणत्याही प्रकारच्या स्पर्श केल्यास होत नाही. रक्तपेशी शी निगडित आहे. हा आजार झाल्यास वेदना, श्वास घेण्यास येणे, हातत्रास, चक्कर पायांना सुज, काविळ, रक्तशयाचा त्रास हे व ईतर ससंग आजार नेहमी होत असतात, त्यामुळे आपल्या रक्ताची तपासणी करून आजाराचे निराकरण करणे महत्वाचे आहे, यासाठी ग्रामस्थांनी घाबरून न जाता आपल्या रक्ताची तपासनी करणे गरजेचे आहे. हि तपासणी ७ फेब्रुवारी पर्यंत या मोहिमेत मोफत करावी, असे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. हे मार्गदर्शन आरोग्य सेवक सुरज बावनवाडे, ज्योती सुरडकर (डाहाके) डॉ. स्वाती डिवरे यांनी केले. या प्रसंगी उपकेंद्र अर्तंगत येत असलेल्या सर्व गावातील आशा सुरेखा गवई, जोरना गडेकर, प्रतिभा सुखदेवे यांनी सहकार्य केले.

### जि.प. वरिष्ठ प्राथमिक मराठी शाळा ग्रामपंचायत कार्यालय अंगणवाडी केंद्रे प्रजासत्ताक दिन साजरा

**तेल्हारा :** तेल्हारा पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या नेर येथे जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक मराठी शाळा ग्रामपंचायत कार्यालय व अंगणवाडी केंद्र येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला यावेळी गावातील विविध रस्त्याने ढोल ताशाच्या गजरात प्रभात फेरी काढण्यात आली भारत माता की जय या जयघोषाने नेरगाव दुमदुमले प्रथम ग्रामपंचायत कार्यालय नेर येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पूजन करून नेर येथील सरपंच सौ जयश्रीताई दोड यांनी ध्वजारोहण केले तर जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा येथील पूजन व ध्वजारोहण मुख्याध्यापक रायपुरे यांनी केले प्रजासत्ताक दिनाचे अवचित्त साधून इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन पालकांचे व गावाचे नाव उज्वल केले यावेळी विविध महापुरुषांच्या वेशभूषा करून गावाला समतेचा संदेश सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये देण्यात आला यावेळी साक्षरतेविषयी व व्यसनाविषयी शपथ ग्रहण करण्यात आली यावेळी कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहुल तायडे सरपंच सौ जयश्रीताई दोड पोलीस पाटील सुनंदाताई चौके ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र भाऊ तायडे सौ कमलाताई इंगळे अर्जुनभाऊ चौके मालुताई तायडे रेणुका ताई मोहोळ उपस्थित होते.

# देगाव वाचनालयात प्रजासत्ताक दिन

**अकोला :** देगांव येथील क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले सार्वजनिक वाचनालयात ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यांत आला. सुरूवातीला कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वनाथ इंगळे यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार, विश्वरत्न, बोधिसत्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस हारार्पण केले. प्रथम सर्वांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रजासत्ताक दिनाच्या पर्वावर वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अशोक शिरसाट यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच राधिका गावंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकून त्यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. प्रांजली अंभोरे, सामाजिक कार्यकर्ते आकाश इंगळे, रेखाताई इंगळे आदिंची याप्रसंगी समयोचित भाषणे झालीत.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport no is **(K1307371)**
-- From --
**MUHAMMAD IZHARUDDIN**
--TO--
**MOHAMMAD IZHARODDIN MOHAMMAD AZIZODDIN**
My Residential Address is -- In Front Shahbabu School Hamja Plot Washim Road Old City Akola Maharashtra 444002.

# दि ग्रेन मर्चंट असो. ने वाहली दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

■अकोला,दि.३१ (प्रतिनिधी)■

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांना दी ग्रेन मर्चंट असो,आडतीया व व्यापारी वर्गाने श्रद्धांजली वाहली. कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधना बद्दल दुखवटा म्हणून व्यापारी वर्गाने आपला व्यवहार गुरुवार २९-१ २०२६ ला कडकडीत बंद ठेवून आपले दुःख व्यक्त केले.दरम्यान बाजार समितीच्या लिलाव सभागृहात श्रद्धांजली सभा घेण्यात आली.यात बाजार समितीचे संचालक राजीव शर्मा,प्रकाश लहाने, ओमप्रकाश गोयनका संदीप चौखंडे,राजेंद्र जोशी, रावसाहेब राहणे यांनी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या विकास कार्यावर आपले विचार व्यक्त केले.यावेळी



अजितदादा पवार यांच्या समवेत विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या विमानातील पायलट,सुरक्षा अधिकारी यांना ही भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.या श्रद्धांजली सभेत यावेळी अरुण केडीया,कनैय्या सराफ,संतोष लोखंडे,नितीन कारिया, मनीष केडीया,चंद्रशेखर कामले,रोहित खंडेलवाल, बालू मानधने,अजय अजमेरा,राजकुमार डोडीया, गजानन देशमुख, सचिन काळमेघ, काबरा, अनिल खुमकर, जुनेद बेनीवाले, सतीश राठी, ओमप्रकाश चांडक, रमाकांत अग्रवाल,अंकुश राठोड,विशालतोष्णीवाल समवेत बाजार समितीमधील व्यापारी,अडते, कामगार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सैनिक शेतकरी वेल्फेअर फाउंडेशनतर्फे तहसीलदारांना प्रतिमा भेट

**पातुर :** सैनिक शेतकरी वेल्फेअर फाउंडेशन अकोला जिल्हा शाखेच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पातुर तहसील कार्यालयात विशेष सन्मान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पातूरचे तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांना फाउंडेशनची प्रतिमा भेट देऊन गौरव करण्यात आला. सदर प्रतिमा सैनिक शेतकरी वेल्फेअर फाउंडेशनच्या अकोला जिल्हा अध्यक्ष सौ. वर्षाताई संजय बगाडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

# आसेगाव बा येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह

### हरिनाम सप्ताहाची सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल

■अकोट,दि.३१ (प्रतिनिधी)■

श्री संत गजानन महाराज प्रगटदिनानिमित्त तब्बल ४३ वर्षापासुन संत वासुदेव महाराजांच्या प्रेरणेने आसेगाव बा. येथिल श्री हनुमान मंदीर परीसरात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. सप्ताहाचे हे ४४ वे वर्ष असून सदानंद महाराज गावंडे यांच्या मार्गदर्शनात व रामदास महाराज हाके यांच्या नेतृत्त्वात १ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.





सप्ताहात दैनंदिन काकडा आरती सकाळी ५ ते ६, ज्ञानेश्वरी पारायण सकाळी ७ ते ११, प्रवचन दुपारी ४ ते ५, हरिपाठ संध्याकाळी ६ ते ७ व हरिकिर्तन रात्री ८ ते १० संपन्न होणारं आहे.सप्ताहात रामकिशन महाराज कराळे, पुरुषोत्तम महाराज कोळशे, दुर्गाताई मराठे, नंदकिशोर महाराज ढेंगे,रवींद्र महाराज केंद्रे,महेश महाराज मारवाडी, नारायण महाराण पडोळे यांचे हरिकिर्तन संपन्न होणार असून ९ फेब्रुवारी रोजी सप्ताहाची समाप्ती तुकाराम महाराज सखारामपुरकर यांच्या काल्याचे किर्तनाने होणार आहे.

९ मार्च रोजी आसेगाव बाजार येथे विवीध गावातील भजनी दिंड्या सहभागी होत गावात पालखी प्रदक्षिणा व मिरवणूक निघणार आहे.सप्ताहात पुष्पाताई भगत, प्रा. दीनदयाल ठाकरे, रामदास महाराज हाके, रमेश पुंडकर, शारदाताई गावंडे,उमेश महाराज मोहोकार, संजिवनीताई वक्ते यांचे प्रवचन होणार आहे.सप्ताहात गायनाचार्य प्रवीण महाराज कुलट, मृदुंगाचार्य राम महाराज वाघ, मयुर महाराज लोड,गायनाचार्य डिगांबर बुवा भोसले, धोडुजी कराळे, हिंमतराव कराळे, बाप्पुराव राखोंडे, विश्वनाथ कराळे, बिलामराब लेकुळे, रामकिसन कराळे मुधाकर कराळे, भागवत कराळे, देवराय कराळे (डिग्रसकर), कान्होबाराव गडदे, कैलास म्हस्के, मारोती हाके, बबन म्हस्के, सांप्रदायीक भजनी मंडळ आसेगांव बाजार, पुंडा (नंदीग्राम) विणेकरी महादेवराव बोंडे, सुभाष रंदे, जनार्धनराव जोध, गजानन टोंगळे सेवा देणार आहेत.

चार दशकाची परंपरा असणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सर्व गावकरी मंडळी आसेगाव बा मिर्झापुर व श्री ज्ञानेश्वरी पारायण समिती हनुमान मंदिर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak, Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८६ महासागर अकोला

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# राष्ट्रवादीचे एकीकरण निश्चित?



अजित पवार यांच्या निधनानंतर दोन मोठे प्रश्न आहेत. पहिला म्हणजे त्यांचा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस कोण सांभाळणार आणि दुसरा म्हणजे तीन वर्षांपूर्वी वेगळे झालेले अजित पवार गट आणि शरद पवार गट आता पुन्हा एकत्र येतील का? दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर होय असेच आहे.

सूत्रांनुसार, दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अजित पवार यांनी स्वतः याचा रोडमॅप तयार केला होता. ते या मुद्द्यावर सातत्याने बैठका घेत होते. त्यांच्या निधनानंतरही दोनदा बैठका झाल्या आहेत. आता ९ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची घोषणा होऊ शकते.

-------------------

शरद पवार आणि भाजप हायकमांड यावर सहमत आहेत. म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचा भाग राहील, यामुळे केंद्रात एनडीएला शरद पवार गटाच्या ८ खासदारांची साथही मिळेल. पक्षाची कमान सांभाळण्यासाठी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा यांना पुढे करण्यात आले आहे. मात्र, प्रफुल्ल पटेल यांच्या दाव्यामुळे काही प्रमाणात ओढाताण निर्माण होत आहे.

**विलय निश्चित, पण परिस्थिती थोडी बदलली**

राष्ट्रवादी (शरद पवार गट) मधील सूत्रांनी दावा केला आहे की दोन्ही पक्षांनी विलीनीकरणाचा आराखडा तयार केला आहे. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर परिस्थिती थोडी बदलली आहे. सूत्रांनी सांगितले, २८ जानेवारी रोजी अजित दादांचे निधन झाले. त्यांच्या निधनापूर्वीच दोन्ही गटांनी विलीनीकरणासाठी ९ फेब्रुवारीची तारीख निश्चित केली होती. आता काही गोष्टी बदलल्या आहेत, पण विलीनीकरण अजूनही निश्चित आहे.

दोन्ही गटाच्या विलीनीकरणासाठी ९ तारीखच का ठरवण्यात आली? याविषयी सूत्र सांगतात की, यामागे शरद पवारांचेच डोकं आहे. एक महिन्यापूर्वी माध्यमांमध्ये विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली होती. शरद पवार आधी परिस्थितीचा अंदाज घेत होते. त्यांनी अशा बातम्या चालू दिल्या. प्रतिसाद चांगला आल्यावर त्यांनी चर्चा पुढे नेली.

आधीच्या वेळापत्रकानुसार ५ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार होत्या आणि ७ फेब्रुवारी रोजी निकाल लागणार होता. रणनीती अशी होती की, आधी निवडणुका संपू द्याव्यात, कारण पुणे जिल्हा परिषद अजित पवारांचा बालेकिल्ला राहिला आहे.

बैठकीत ठरले होते की, शरद गटाचे उमेदवारही अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'घड्याळ' या चिन्हावरच निवडणूक लढवतील. आता दोन्ही पवार एकत्र येत आहेत, असा संदेश दिला जाईल. त्यानंतरच घोषणा होईल. आता त्याआधीच परिस्थिती बदलली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दावा केला आहे की, अजित पवारांनी महाराष्ट्रातील महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर दोन्ही गटांच्या विलीनीकरणावर एकत्र बसून निर्णय घेण्याबाबत सांगितले होते.

शिंदे म्हणाले, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकांसाठी दोन्ही पक्षांच्या युतीसाठी आम्ही भेटलो होतो. तेव्हा त्यांनी (अजित पवार) सांगितले होते की, ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांनंतर आम्ही बसून चर्चा करू.

अजित पवारांचे ४० वर्षांहून अधिक काळ सहकारी असलेले किरण गुर्जर यांनीही अजित पवारांनी अपघाताच्या पाच दिवसांपूर्वी सांगितले होते की त्यांना दोन्ही गटांचे विलीनीकरण हवे आहे. प्रक्रिया पूर्ण झाली आहे आणि पुढील काही दिवसांत विलीनीकरण होणार आहे, असेच सांगितले आहे.

३० जानेवारी रोजी शरद गटाचे नेते अनिल देशमुख यांनी सांगितले की, अजित पवारांची शेवटची इच्छा होती की राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र यावेत. ही इच्छा पूर्ण केली पाहिजे. तर, पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी विलीनीकरणावर बैठक झाल्याची पुष्टी केली आहे.

त्यांनी सांगितले की, अजित पवार या मुद्द्यावर सकारात्मक होते. त्यांनी सांगितले होते की, आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका युती करून लढवाव्यात, निवडणुकीनंतर विलीनीकरणावर निर्णय घेऊ. अशा ४ ते ५ बैठका झाल्याचे त्यांनी मान्य केले आहे. ते दावा करतात, विलीनीकरणाचा प्रस्ताव शरद गटाकडून आला होता. अजित दादा यावर आनंदी होते. ते आपल्या पक्षाच्या वतीने पुढे येऊन बैठका घेत होते. शरद गटातून जयंत पाटील, अमोल कोल्हे आणि रोहित पवार बैठकीत सहभागी झाले होते.

**विलयमुळे भाजपलाही फायदा हाय कमांडची संमती**

सूत्रांनी दावा केला आहे की अजित पवारांना भाजप हायकमांडकडून हिरवा कंदील मिळाला होता. भाजपलाही दोन्ही पक्ष एकत्र यावेत असे वाटते, त्यामुळे ते यात अडथळा आणत नाहीत. महाराष्ट्रात भाजप सरकार मजबूत आहे, परंतु लोकसभेत त्यांना शरद पवार गटाच्या ८ खासदारांची गरज आहे.

अजित पवारांकडे फक्त एक खासदार आहे. जर राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आली, तर केंद्रात भाजपला ९ खासदारांचा पाठिंबा मिळेल, जो एक मोठा आकडा आहे.

सूत्रांनुसार, भाजपला शरद पवारांसोबत काम करणे सोयीचे नाही. म्हणूनच एक योजना तयार करण्यात आली होती. शरद पवारांनी आधीच संकेत दिले होते की मार्चमध्ये राज्यसभेचा कार्यकाळ संपल्यानंतर ते राजकारणात सक्रिय राहणार नाहीत. योजना अशी होती की शरद पवारांनी सन्मानपूर्वक बाहेर पडावे, त्यानंतर सुप्रिया सुळे दिल्ली आणि अजित पवार राज्य सांभाळतील. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांना आणि भाजपलाही फायदा होता.

**महापालिका निवडणुकीतून एकत्र येण्याची सुरुवात**

महापालिका निवडणुकांमध्ये दोन्ही गटांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये युती केली होती. हे दोन्ही पक्ष एकत्र येण्याच्या दिशेने पहिले पाऊल होते. उमेदवारांना शरद पवार गटाच्या 'तुतारी' या निवडणूक चिन्हाऐवजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'घड्याळ' या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढण्यास सांगण्यात आले. तरीही युतीचा फायदा झाला नाही.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) च्या एका वरिष्ठ नेत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, 'पवार कुटुंबाने मिळून ठरवले आहे की आता अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवारांना पुढे केले जाईल. अजित दादांच्या दोन्ही मुलांकडे राजकीय अनुभवाची कमतरता आहे. सुनेत्रा पवार राज्यसभा खासदार आहेत आणि त्यांच्या नावावर कुटुंब किंवा आमदारांमध्ये कोणताही विरोध नाही.'

**अजित पवार यांच्यानंतर पक्षाच्या नियंत्रणावर ओढाताण**

शरद गटातील आमच्या सूत्रांनी दावा केला आहे की, दोन्ही गट एकत्र आल्यास, अजित पवार यांनी महाराष्ट्रात पक्षाची धुरा सांभाळल्यास आणि सुप्रिया सुळे दिल्लीत राहिल्यास प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांसारखे नेते बाजूला पडले असते. प्रफुल्ल पटेल हे शरद पवार यांच्या सर्वात जवळच्या व्यक्तींपैकी एक होते. पक्ष फुटण्यापूर्वी शरद पवार यांनी अजित पवार यांच्यावर त्यांना प्राधान्य देऊन पक्षाचे कार्याध्यक्ष बनवले होते.

सूत्र सांगतात, प्रफुल्ल पटेल यांची भाजपशी जवळीक आहे. अजित पवार यांनाही ही गोष्ट माहीत होती. त्यांच्या निधनानंतर आता शरद पवार स्वतः सूत्रे हाती घेऊ इच्छितात जेणेकरून पक्षावर कुटुंबाचे नियंत्रण राहील आणि पूर्वीसारखी समज कायम राहील.

शरद पवार जयंत पाटील आणि शशिकांत शिंदे यांसारख्या आपल्या निष्ठावान नेत्यांना राज्याच्या राजकारणात प्रस्थापित करू इच्छितात. मात्र, प्रफुल्ल पटेल यांना बाजूला सारणे सोपे नाही. प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांना पक्षावर आपले वर्चस्व राहावे असे वाटते.

तथापि, दादांच्या जाण्यानंतर आता त्यांच्या पक्षाकडून अन्य कोणत्याही नेत्याऐवजी सुनेत्रा पवार यांचेच नाव पुढे करण्यात आले आहे. या नावाला अजित पवार गटातून विरोध होण्याची सूतराम शक्यता नाही. तसे झाल्यास पक्षाचे निर्णय बारामतीमधून घेतले जातील आणि त्या निर्णयात शरद पवार यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग राहू शकेल. त्यामुळे राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाल्याचे लवकरच दिसून येईल.

## समतावादी क्रांतीचे प्रणेते
# संत शिरोमणी रविदास महाराज

संज्योती चंदन
हनुमान नगर,
अग्रवाल लेआउट,
अकोला.

भारतीय समाजव्यवस्थेत ज्यावेळी जातीभेद आणि कर्मकांडांचा अंधकार दाटला होता, अशा काळात मानवतेचा प्रकाश पसरवणारे महान क्रांतीकारक संत म्हणजे संत रविदास महाराज.

*मन चंगा तो कठौती में गंगा...*

असा सोपा पण गहन विचार मांडत त्यांनी ईश्वर भक्तीला कमार्शी जोडले. १ फेब्रुवारी रोजी त्यांची जयंती साजरी होत असताना, त्यांच्या विचारांची प्रस्तुतता आजही तितकीच प्रकर्षाने जाणवते.

**बालपण आणि संघर्ष**

संत रविदासांचा जन्म वाराणसीतील गोवर्धनपूर येथे झाला. त्यांचा परिवार चर्मोद्योगाशी निगडीत होता. लहानपणापासूनच त्यांना ईश्वरी भक्तीची ओढ होती, परंतु तत्कालीन सामाजिक रचनेमुळे त्यांना अनेक विषमतेला सामोरे जावे लागले. त्यांनी आपल्या वडिलोपार्जित व्यवसायाला कधीही कमी मानले नाही, उलट 'श्रम हाच ईश्वर' हा संदेश दिला.

**दोह्यांतून समाजप्रबोधन**

संत रविदासांनी आपल्या वाणीतून (दोह्यांतून) समाजातील दांभिकतेवर प्रहार केला. ते म्हणतातः

*जाति-जाति में जाति हैं,*
*जो केतन के पात।*
*रैदास मनुष ना जुड़ सके,*
*जब तक जाति न जात॥*

(ज्याप्रमाणे केळीच्या खांबाला सोलत गेले की फक्त पानेच निघतात, गाभा सापडत नाही; तसेच माणसाला जातीत विभागले तर माणूस म्हणून तो कधीच एक होऊ शकणार नाही. जोपर्यंत जात जात नाही, तोपर्यंत माणूस जोडला जाणार नाही.) त्यांच्या अशा शेकडो रचना आजही 'गुरु ग्रंथ साहिब' मध्ये समाविष्ट आहेत, जे त्यांच्या महानतेचे प्रतीक आहे.

**बेगमपुराः एक आदर्श लोकशाहीची संकल्पना**

संत रविदासांनी मांडलेली 'बेगमपुरा' ही संकल्पना जगातील पहिली 'युटोपिया' (आदर्श समाज) मानली जाते. बेगमपुरा म्हणजे काय? 'बे' म्हणजे शिवाय आणि 'गम' म्हणजे दुःख. जिथे कोणालाही दुःख (Grief) नाही, असे शहर म्हणजे बेगमपुरा.

**वैशिष्ट्ये :** बेगमपुरामध्ये कोणताही भेदभाव नाही, तिथे कोणी श्रीमंत वा गरीब नाही. तिथे कर (Tax) नाही, कोणावरही अन्याय नाही आणि सर्वांना मुक्तपणे फिरण्याचे स्वातंत्र्य आहे.

**महत्त्व :** ही केवळ एक धार्मिक कल्पना नसून ती एक राजकीय आणि सामाजिक लोकशाहीची मांडणी होती, जिथे मानवी हक्कांना सर्वोच्च स्थान होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत रविदास**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संत रविदासांच्या विचारांनी अत्यंत प्रभावित होते.

**ग्रंथ अर्पण :** डॉ. बाबासाहेबांनी आपला 'द अनटचेबल्स' (The Untouchables) हा महत्त्वपूर्ण ग्रंथ संत रविदास, संत चोखामेळा आणि संत नंदनार यांना अर्पण केला आहे.

कारण बाबासाहेबांना हे ठाऊक होते की, अस्पृश्यतेविरुद्धचा लढा त्यांनी सुरू करण्याच्या शतकानोवर्षे आधी या संतांनी आपल्या भक्ती आणि विचारातून लढला होता. संत रविदासांची 'बेगमपुरा' संकल्पना आणि बाबासाहेबांचे 'प्रबुद्ध भारत' हे दोन्ही एकाच ध्येयाकडे जाणारे मार्ग होते–ते म्हणजे 'समता, बंधुता आणि न्याय'.

**समान विचार :** दोघांनाही असा समाज हवा होता जिथे जन्मावर आधारित श्रेष्ठत्व नसेल, तर गुणांवर आधारित सन्मान असेल.

**निष्कर्ष :** संत रविदास महाराज केवळ एका समाजाचे नसून संपूर्ण मानवजातीचे मार्गदर्शक होते. त्यांनी शिकवलेली श्रमाची प्रतिष्ठा आणि 'बेगमपुरा' ही संकल्पना आजही लोकशाही बळकट करण्यासाठी आवश्यक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

# मानवतेचे संत गुरू रविदास



प्रमोद जांभुळकर
नागपूर.
९८२३९६१०९७

समाज जेव्हा जन्मावर माणसाची किंमत ठरवत होता, तेव्हा त्या अंधाऱ्या काळात समतेचा तेजस्वी विचार घेऊन संत गुरू रविदास अवतरले. गुरू रविदास जयंती म्हणजे केवळ स्मरणदिन नव्हे; ती समाजाच्या अंतरात्म्याला प्रश्न विचारणारी आणि आत्मपरीक्षणाची संधी आहे.

इ.स. १४५० च्या सुमारास उत्तर प्रदेशातील वाराणसी (काशी) येथे गुरू रविदासांचा जन्म झाला. माघ पौर्णिमा हा दिवस सामाजिक इतिहासात परिवर्तनाचा संकेत ठरतो. वडील संतोकदास आणि आई कलाबाई यांच्या श्रमिक जीवनातून घडलेले गुरू रविदास जन्मतःच भेदभावाचे साक्षीदार होते. मात्र त्यांनी या अन्यायाला नियती मानले नाही; उलट त्याविरुद्ध विचारांची मशाल पेटवली.

गुरू रविदासांचे कार्य केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी श्रमाची प्रतिष्ठा, मानवाची समानता आणि बंधुतेचा विचार समाजासमोर ठामपणे मांडला. जात, वर्ण आणि कर्मकांडांवर त्यांनी निर्भीड टीका केली. ईश्वर सर्वांचा आहे, आणि भक्ती ही कोणत्याही जातीची मक्तेदारी नाही, हा त्यांचा ठाम संदेश होता.

त्यांनी कल्पिलेलं बेगमपुरा – दुःख, भूक, भेदभाव आणि भीती नसलेलं समाजस्वप्न– आजही सामाजिक न्यायाच्या लढ्याला दिशा देतं. त्यांच्या अभंगांचा समावेश गुरू ग्रंथ साहिब मध्ये होणं हे त्यांच्या विचारांच्या व्यापक आणि सार्वकालिक स्वीकाराचं प्रतीक आहे.

आजही जातीय अन्याय, सामाजिक बहिष्कार आणि विषमता वेगवेगळ्या रूपांत अस्तित्वात आहेत. म्हणूनच गुरू रविदासांचे विचार कालबाह्य ठरत नाहीत; उलट ते अधिक अस्वस्थ आणि मार्गदर्शक वाटतात. संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांचे बीज गुरू रविदासांच्या विचारांत स्पष्टपणे दिसते.

गुरू रविदास जयंती म्हणजे फक्त पूजा नाही, ती जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांना कृतीत उतरवण्याची जबाबदारी. कारण समाज बदलतो तो घोषणांनी नाही, तर समतेच्या आचरणाने.

समता हीच खरी भक्ती आणि मानवता हाच खरा धर्म–हा गुरू रविदासांचा संदेश आजही तितकाच संगत, तितकाच क्रांतिकारी आहे.

■ ■ ■

# घड्याळ चालू आहे, पण दिशा ठरलेली नाही!



अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी केवळ एका नेत्याच्या जाण्याची नाही, तर निर्णयक्षमता, धाडस, प्रशासकीय पकड आणि कार्यकर्त्यांना दिलासा देणाऱ्या नेतृत्त्वाच्या अभावाची आहे. गेल्या दोन दशकांत राष्ट्रवादी काँग्रेस आणि राज्याच्या सत्ताराजकारणात अजित पवार हे केंद्रस्थानी होते. त्यांच्या जाण्याने थांबलेली घडी आता पुढे सरकणारच आहे, मात्र ती कुठल्या दिशेने जाईल, हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणाला अस्वस्थ करणारा आहे.

**तीन वाटांवर उभी असलेली राष्ट्रवादी**

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस गट तीन ठळक पर्यायांच्या उंबरठ्यावर उभा आहे.

**पहिला पर्याय : शरद पवार यांच्या नेतृत्त्वाखाली एकत्र येणे**

हा पर्याय भावनिकदृष्ट्या कार्यकर्त्यांना सर्वाधिक जवळचा आहे. पवार हे आडनाव, शरद पवार यांचा प्रदीर्घ अनुभव, त्यांची रणनीती आणि राष्ट्रीय पातळीवरील वजन यामुळे पक्षाला स्थैर्य मिळू शकते. मात्र, शरद पवार यांची भाजपविरोधी भूमिका कायम आहे. बदललेल्या परिस्थितीत ते ही भूमिका कायम ठेवतील का, की वास्तववादी निर्णय घेतील, यावर बरंच काही अवलंबून आहे.

**दुसरा पर्याय : पवार कुटुंबातूनच नवे नेतृत्व उभे करणे**

अजित पवारांच्या जागी पक्षाचा नवा अध्यक्ष, उपमुख्यमंत्री असा पर्याय समोर येऊ शकतो. पण पद मिळणं आणि नेतृत्व स्वीकारलं जाणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अजित पवारांसारखा सर्वसमावेशक, धाक असलेला आणि कार्यकर्त्यांर्ला ह्यमी आहेह्न असं सांगणारा नेता सध्या पक्षात दिसत नाही. हाच या पर्यायाचा मोठा कमकुवतपणा आहे.

तिसरा पर्याय : शरद पवारांपासून अंतर ठेवून भाजपसोबत राहणे सत्तेच्या दृष्टीने हा पर्याय तात्कालिक सुरक्षित वाटतो.

मात्र, दीर्घकालीन राजकारणात यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची वैचारिक ओळख पुसली जाण्याचा धोका आहे. धर्मनिरपेक्षतेच्या भूमिकेवर उभ्या असलेल्या पक्षासाठी हा निर्णय आत्मघातकी ठरू शकतो.

**सक्षम पर्याय आहे का?**

अजित पवारांच्या जागी कोणीही आले, तरी तो नेता केवळ खुर्चीवर बसून चालणार नाही. अजित पवार यांची खरी ताकद त्यांच्या वैयक्तिक संपर्कात होती. जातीपातीपलीकडे जाऊन त्यांनी तरुणांना, कार्यकर्त्यांना, आमदारांना जोडले. मंत्रालयातील सहा मजल्यांतून गावागावांत कामे करून देण्याची क्षमता त्यांनी निर्माण केली होती. त्यामुळेच कार्यकर्त्यांना वाटायचं सत्ता आपल्या हातात आहे. आज हीच भावना हरवली आहे.

**फडणवीसांची कोंडी आणि सत्तासंतुलन**

अजित पवार यांचे निधन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी वैयक्तिक आणि राजकीय दोन्ही पातळ्यांवर मोठी हानी आहे. महायुतीमध्ये अजित पवार हे बॅलन्स फॅक्टर होते. भाजपला धर्मनिरपेक्ष चेहरा देणारे, आणि तीन पक्षांचे सरकार प्रत्यक्षात चालवणारे ते महत्त्वाचे दुवे होते.

आता उपमुख्यमंत्री पदावर येणारा नवा चेहरा फडणवीस यांच्याशी कसा जुळतो, यावर सरकारमधील अंतर्गत सत्तासंतुलन ठरणार आहे. बहुमत भक्कम आहे, सरकार पडणार नाही; पण सरकारमधील एक उमदे सरकार हरपले आहे.

**सुप्रिया सुळे आणि पवार घराण्याभोवतीचे प्रश्न**

सुप्रिया सुळे यांनी पक्षाची सूत्रे हातात घेतली, तर त्या राज्याच्या सत्ताकेंद्रात सक्रिय होतील का, हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. लोकसभेत बसून राज्यातील आमदार आणि कार्यकर्त्यांची मंत्रालयीन कामे कशी मार्गी लागणार? राज्यात येऊन त्या उपमुख्यमंत्री होतील का? मुळात त्यांची तशी इच्छा आहे का?

पार्थ पवार आणि जय पवार अजून राजकीयदृष्ट्या अपरिपक्व आहेत. सुनेत्राताई पवार राज्यभर फिरून संघटन उभं करू शकतील का, याबाबतही साशंकता आहे. छगन भुजबळ आजारातून सावरत आहेत, तर जयंत पाटील यांना दोन्ही गटांत सर्वमान्य नेतृत्व म्हणून स्वीकारलं जाईल का, हेही अनिश्चित आहे.



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

**कार्यकर्त्यांची अस्वस्थता आणि सत्तेची गरज**

अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारानंतर अनेक नेते अक्षरशः हतबल झालेले दिसले. आता कोणाकडे पाहून राजकारण करायचं? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहे.

कार्यकर्त्यांना ताकद सत्तेमधून मिळते. मंत्रालयातून एक फोन, एक सही, एक फाइल पुढे जाण, यातूनच स्थानिक राजकारण जिवंत राहतं. जर ही ताकद पक्षातून मिळाली नाही, तर नेते पर्याय शोधतात, हा इतिहास आहे. हीच अस्वस्थता आज दोन्ही राष्ट्रवादी गटांत दिसते आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसची घड्याळ थांबलेली नाही; ती दिशाहीन अवस्थेत फिरत आहे. ही दिशा केवळ सत्तेच्या गणितावर नाही, तर विश्वासार्ह नेतृत्व, भावनिक बांधिलकी आणि प्रशासकीय पकड यावर ठरणार आहे.

एकछत्री नेतृत्त्वावर उभ्या असलेल्या प्रादेशिक पक्षांसमोर असा संक्रमणकाळ नेहमीच कठीण असतो. आता प्रश्न एवढाच आहे की राष्ट्रवादी काँग्रेस आपली ओळख जपून सत्ता मिळवते, की सत्तेसाठी आपली ओळख नव्याने घडवते? याच निर्णयावर महाराष्ट्राच्या राजकारणातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पुढील अस्तित्व आणि प्रभाव अवलंबून असणार आहे.

# दिल्ली ट्रिब्युनलने प्रसिद्ध रितु बजाज केसमध्ये स्त्रीधनला मान्यता दिली की नाही?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.





गेल्या आठवड्यात आपण बघीतले की किती सोन्याचे स्त्रीधन म्हणून कायदेशीर मान्यता मिळु शकते. आज आपण दिल्ली येथील इन्कमटॅक्स ट्रिब्युनल चे श्रीमती रितु बजाज यांचे स्त्रीधन बद्दलची केस बघणार आहोत.

**प्रश्न** : दिल्लीच्या रितु बजाज केसमध्ये स्त्रीधनबद्दल इन्कमटॅक्सच्या कोर्टाने काय भूमिका घेतली?

■ रितु बजाज यांच्या घरी इन्कमटॅक्सची धाड पडली. सर्च मध्ये ज्वेलरी सापडली बँकेच्या विथड्रॉलही जास्त नव्हते यामुळे बँकेतून पैसे काढून दागिने खरेदी केले असे सांगणारे पुरावे नव्हते. या सगळ्या गोष्टीमुळे पुरावे विरोधात होते. यामुळे इन्कमटॅक्स विभागाने १३,४७,८२७/- इतके रुपयाची त्या वेळची किंमत इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी काढली व सर्व रुपात इन्कमटॅक्स जोडून टॅक्स लावले.

या वेळी रितु बजाज यांनी इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना सांगितले की त्यांचा हार हा सोन्याचा व त्याला हिरे जोडलेले असले तरी ते वडिलोपार्जीत आहे. जे त्यांच्या कडे होते ते लग्नाच्या वेळी त्यांच्या मित्र परिवार तथा नातेवाईकांनी भेट म्हणून दिले. सोन्याच्या चैनी आणि तोरड्या हे त्यांच्या मुलांच्या वाढदिवशी व इतर प्रसंगी भेट म्हणून आलेले आहेत. या सगळ्या गोष्टी इन्कमटॅक्स ट्रिब्युनल यांना पुराव्यानिशी दाखवण्यात आल्या.

करदात्याचे म्हणणे काय असते, हे इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी ऐकलेच पाहिजे असे ताशेरे ओढून दिल्ली ट्रिब्युनल यांनी श्रीमती रितु बजाज यांचे पूर्ण म्हणणे एकुण घेतले. रितु बजाज यांचा सामाजिक दर्जा बघता या सगळ्या युक्तिवादास मान्यता देण्यात आली व रितु बजाज यांच्या उत्पन्नात इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने जोडलेले सर्व १३,४७,८२७/- रुपयात कमी करण्याचे आदेश दिल्ली ट्रिब्युनल यांनी दिले.

या वेळेस ही केस खूप गाजली होती. श्रीमती रितु बजाज यांचे सर्व पुरावे मान्य करून स्त्रीधन म्हणून मान्यता देण्यास आली. या केस मध्ये रितु बजाजवर लावलेले इन्कमटॅक्स माफ करण्यात आले. हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

पुढील आठवड्यापासुन आपण स्त्रीधनबद्दल चे काही केस करदात्यांच्या विरोधात ही गेलेले आहेत, ते केस कोणते तथा विरोधात जाण्याची कारणे काय ? याची संक्षिप्त माहिती जाणून घेणार आहोत, जी सर्व महिलांना व्यवहारात उपयोगी ठरावी. तसेच तलाक झाल्यानंतर स्त्रीधन बद्दल कोर्ट काय सांगत. याची माहिती पण जाणून घेणार आहोत.

■ ■ ■

# चिकन, मटण आणि फिश कोणत्या व्यक्तींनी खाऊ नये?



शरीरात प्रोटीनची कमतरता असेल तर चिकन, मटण आणि मासे यांना पौष्टीक म्हणून गणले जाते. जिम ट्रेनरपासून ते डाएट चार्ट पर्यंत,प्रत्येक जागी याचा उल्लेख केला जातो.

परंतू सत्य हे आहे की प्रत्येकाची प्रकृती वेगळी असते. अशात एखादा पदार्थ एकासाठी चांगला असेल तर दुसऱ्याला त्यापासून त्रास होऊ शकतो. नॉन व्हेज पदार्थाकडे लोक केवळ प्रोटीनचा स्त्रोत, चविष्ठपणा किंवा ट्रेंड्स म्हणून पाहातात.

परंतू कमी लोकांना माहिती आहे की चिकन, मटण आणि मासे यांनी शरीरात उष्णता,कोलेस्ट्रॉल, एलर्जी, हार्मोन्स असंतुलनासारख्या समस्या तयार होतात. तज्ज्ञांच्या मते काही लोकांनी अत्यंत कमी प्रमाणात यांचे सेवन करावे. तर काही लोकांनी नॉनव्हेज खाऊच नये.

चिकन कोणी आणि का खाऊ नये ?

होलिस्टिक डायटिशियन आणि इंटेग्रेटिव्ह थेरोपेटिक न्यूट्रिशनिस्ट डॉक्टर गीतिका चोपडा यांनी सांगितले की चिकन सर्वात लीन आणि सहज पचणारा पर्याय आहे. खासकरुन चिकन ब्रेस्ट हे वजन घटवण्यासाठी, PCOS, डायबीटिज आणि फॅटी लिव्हरवाल्यांना प्रोटीनचा बेस्ट सोर्स मानला जातो. कारण यात फॅट कमी आढळते.

मात्र, ज्या लोकांना युरिक एसिडची समस्या असते. त्यांनी चिकनचे सेवन करु नये. तसेच किडनीचा आजार असेल तरी चिकन खाऊ नये. कारण चिकनमध्ये हाय प्युरिन असते. शरीर जेव्हा प्युरिन पचवते तेव्हा त्यातून युरिक एसिड तयार होते. त्यामुळे आधीच युरिक एसिडची समस्या असणाऱ्या घातक ठरु शकते.

**मटण कोणी खाऊ नये?**

मटणाचा स्वाद अनेकांना आवडतो. याची न्युट्रिशन व्हॅल्यू देखील चांगली असते. हा हेव्ही प्रोटीन सोर्स आहे. यात आयर्न देखील चांगले असते. परंतू यात हाय फॅट देखील असते. अशात हार्ट डिसीज, हाय कॉलेस्ट्रॉल, हाय ब्लड प्रेशर, कमजोर पचन वाले आणि वीक मेटाबॉलिज्मवाले लोकांना मटण खाऊ नये. तसेच रोजच्या आहारात ही मटण खाऊ नये.

जर खायचे असेल तर कमी तेल-मसाले वाले मटण खावे असे डॉ. रिऋ शर्मा (डायटीशियन, कैलाश दीपक हॉस्पिटल) यांनी म्हटले आहे.

**मासे कोणी खाऊ नयेत?**

मासांना सर्वात हेल्दी म्हटले जाते. मासे मेंदू आणि हार्टसाठी प्रोटीनचा बेस्ट सोर्स मानले जातात. यात ओमेगा ३ फॅटी एसिड देखील असते.

ज्यामुळे इंफ्लेमेशनला कमी करण्यात ते मदत करते. डायबिटीज, थायरॉईड, हार्मोल इम्बॅलन्स आणि एजिंग क्लायंट्ससाठी फिश फायदेशीर म्हटले जातात. ज्या लोकांना सीफूडची एलर्जी आहे. किंवा किडनीची समस्या आहे. आणि फॉस्फरस रिस्ट्रीक्शन असेल तर मासे खाणे टाळावे किंवा कमी प्रमाणात खावेत.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



**कॉपी मुक्ति अभियान..!**

कॉपी करून
पास होण्याची
ठेवू नका मनी आस
भविष्यात पदरी पडेल
निराशा हमखास..!

अपयश येता पदरी
चिंतन कर थोडे
लक्षात येईल तुझ्या
का अडले
आपले घोडे ..!

खचू नको अंतरी
प्रयत्नांची धर कास
आज नाही तर उद्या
यश मिळेल हमखास ..!

# भक्तिमार्ग

## हनुमानाचं निवासस्थान

हिंदू धर्मात सप्तचिरंजीवांचा उल्लेख आढळतो. हनुमानालाही रामाच्या आशीर्वादामुळे अमरत्त्वाचं वरदान लाभलंय. त्याच्या अस्तित्त्वाबद्दलच्या सुरस कथा आजही ऐकायला मिळतात. हनुमान आजही कैलास पर्वताच्या उत्तरेकडच्या विशिष्ट ठिकाणी हनुमान आजही वास करतो, असं म्हटलं जातं. विविध धर्मग्रंथ आणि पुराणांमध्येही हनुमानाच्या निवासस्थानाचं वर्णन सापडतं. हनुमान गंधमादन पर्वतावर निवास करतो, असं मानलं जातं. एका कथेनुसार, अज्ञातवासात असताना पांडव हिमवंत पार करून गंधमादन पर्वतावर दाखल झाले. याच पर्वतावर हनुमानाने भीमाचं गर्वहरण केलं. गंधमादन पर्वत कैलास पर्वताच्या उत्तरेकडे वसलाय. महर्षी कश्यप यांनी या पर्वतावर तपश्चर्या केली होती, असा उल्लेख आढळतो. या पर्वतावर गंधर्व, किन्नर, सिद्धमुनी, अप्सरांचा वासही असल्याचं बोललं जातं. या पर्वत शिखरावर पोहोचणं फार अवघड आहे. या ठिकाणी वाहन नेता येत नाही.

गंधमादन पर्वत आज तिबेटमध्ये आहे. वेदकाळात या पर्वतक्षेत्रावर कुबेराचं राज्य होतं. सुमेरू पर्वताच्या चारही दिशांना असलेल्या गजदंत पर्वतापैकी एक म्हणजे गंधमादन पर्वत. याच नावाचा एक पर्वत



दक्षिणेकडे रामेश्वरमजवळही वसलाय. या पर्वतावरूनच हनुमानाने लंकेच्या दिशेने उडी घेतली होती.

तीर्थक्षेत्र

गंधमादन पर्वतावर मंदिर उभारण्यात आलंय. या मंदिरात हनुमानासोबतच राम, सीता यांच्या मूर्ती आहेत. याच पर्वतावरून भगवान राम रावणाविरोधात युद्धाची रणनीती आखत असत असं म्हटलं जातं. आजही या पर्वतावर रामाच्या पाउलखुणा आढळतात, असं भक्तमंडळी सांगतात.

## ऋतू वसंत आला...

**वसंत म्हणजे चैतन्य, वसंत म्हणजे उल्हास आणि वसंत म्हणजे आशा... निसर्गभक्ती जागवणारं हे एक सर्जनपर्व आहे. रुक्ष, काष्ठवत झाडांवर कोवळी पालवी फुलू लागणं, लता-वेलींवर सुगंधी घोस लगडू लागणं, वातावरणात हवीहवीशी ऊब जाणवणं, सुगंधी लाटा आदळू लागणं हे वातावरण बदलाचे संकेत आहेत. ते आपल्याला साद घालत असतात. दोन क्षण थांबवू पहात असतात. त्यांची आर्जवं ऐकायलाच हवीत. त्यांना प्रतिसाद द्यायलाच हवा.**

वसंत... या नावातच चैतन्याचा वास जाणवतो. थंडीच्या गारठलेल्या पर्वानंतर वसंत अवतरतो आणि मरगळलेल्या चराचराला जणू नवऊर्जा मिळते. काहीशा ऊबदार झुळुकीसरशी उन्हाळ्याचे पदरव जाणवू लागतात आणि वसंतागमनाचे वेध लागतात. वसंत म्हणजे सर्जनाचा आविष्कार. वसंत म्हणजे नवनर्मितीची नव्हाळी, वसंत म्हणजे कोवळी पालवी. म्हणूनच वसंताचं आगमन एक आगळीच प्रफुल्लता देऊन जातं. आताही असा हसरा वसंत अवतरला आहे. गावातच नाही तर शहरातही हा ऋतूबदल जाणवतोय. वसंत ऋतूची पावलं वाजू लागत आहेत हे या सतत धुळीनं माखलेल्या झाडांवरूनच ओळखता येतं. अचानक एखाद्या झाडाला पिवळ्या पिवळ्या फुलांचे उच्च लोंबू लागतात. फुलांच्या नाजूक पाकळ्या पथावर गळून पडतात आणि त्या पिवळ्या फुलांचा गालीचा पसरत राहतो. या रस्त्यावरुन जाताना फुलांच्या पायघड्यांवरुन जात असल्याचा भास झाल्याशिवाय रहात नाही. या दिवसात उष्ण वारं अंगावर येतं पण येताना बरोबर एक सूक्ष्म सुगंध आणतं. कुठून आला हा सुगंध, असं म्हणत शेजारी पहावं तर कोपऱ्यावरचा भव्य शिरीष वृक्ष नाजूक गुलाबी फुलांनी बहरलेला दिसतो आणि समजतं की गंधाचं मूळ इथे आहे! असे एक ना अनेक सुगंधी वृक्ष-लता या दिवसांमध्ये ठिकठिकाणी फुललेले असतात. कुठे मोगरा पानोपानी फुलत असतो, कुठे चमेलीला बहर आलेला असतो तर कुठे पांगारा फुलू लागलेला असतो. अजूनही कुंदाचा बहर कमी झालेला नसतो. आंब्याच्या मोहोराचा घमघमाट तर किती तरी दूरवरुन सुखावू लागतो. अशा सुगंधाच्या लाटा येत राहतात आणि तनामनाला प्रफुल्लित करत राहतात.

याच ऋतुत पांगाऱ्याच्या झाडावर लाल कळ्या दिसू लागतात. काही कळ्या अर्धवट उमललेल्या दिसतात. गंमत म्हणजे एखादा पक्षी त्या फुलात चोच खुपसून मध चाखताना दिसतो. लाल फुलांच्या जवळ बसलेला एखादा काळा कुळकुळीत कावळा हे दृष्यही किती मजेदार आहे! कावळा उकिरड्यावरचं उष्टं खरकटं वेचताना दिसतो हे आपल्याला परिचित दृष्य आहे पण तोच कावळा फुलातला मध किती हळूवारपणे टिपून घेतो हे कुणी पाहिलंय का? पण त्याच्याकडे लक्ष द्यायला वेळ कोणाकडे आहे? माणसं सकाळपासून बस, वा टॅक्सी पकडताना दिसतात. जनतेचा लोंढा रेल्वेगाडीकडे झुंबड करून चाललेला दिसतो. अशा वेळी निसर्गाचं, सृजनाचं आणि पाना-फुलाचं वेड एखाद्याला गुंडाळूनही ठेवावं लागतं. ज्यांच्यापाशी गाड्या आहेत ती माणसं सतत इतरांना 'ओव्हरटेक' करत, भरधाव वेगानं धावताना दिसतात. घाई, गर्दी, गडबड, गजबज, गोंगाट, धावपळ म्हणजे



सध्याची ही मोठी शहरं. पुढे जाण्यापलीकडे इथे कुणालाच वेळ दिसत नाही. अशा वेळी रस्त्याच्या कडेला फुलाफुलातून डोकावणारा वसंत ऋतू बघावा, त्याची भेट घ्यावी,

भक्ती लेख

त्याच्यातलं सौंदर्य न्याहाळून पहावं, आतून प्रसन्न व्हावं किंवा कधी कधी आतून पुलकित व्हावं असं कोणालाच वाटत नाही. कारण प्रत्येकाला आपल्या जबाबदारीची तीव्र जाणीव असते आणि उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी त्यांना सतत पळायचं असतं. अशा वेळी 'वासंतिक समय पातला' असं हळुवारपणे गुणगुणावंसं कोणालाच वाटत नाही.

अर्थार्जन हे आजच्या जीवनाचं प्रमुख उद्दिष्ट बनलं आहे. पैसा मिळवण्यासाठी माणसाची धडपड चालली आहे. त्याला सतत महागाईला तोंड द्यावं लागत आहे. अर्थार्जनासाठी सतत मानसिक आणि शारीरिक ताण सहन करावा लागत आहे. जगण्यासाठी सतत चाललेली ही धडपड वाढतच आहे. त्याला वेळ कुठे आहे बदलत्या ऋतूंकडे लक्ष द्यायला? सध्या निसर्गात काय घडामोडी घडत आहेत? हे त्याच्या खिसगणतीतही नाही. वसंत ऋतू येतो आणि जातो. तसाच वर्षा ऋतू येतो आणि मग शिशिर. गर्दीने गजबजलेल्या रस्त्याच्या कडेला पावसाळ्यात घनदाट हिरवी पालवी भेटते. थंडीत त्याच झाडांची पालवी सुकून पिवळी पडते आणि सुकलेल्या पानांचा दिवसभर वर्षाव होतो. फुटपाथवरचा पाचोळा पडत राहतो. हे सगळं घडत असतं पण आपण मात्र झापडं लावून जगत राहतो.

निसर्ग सतत बदलत राहतो. आपलं नवतळी रूप दाखवत राहतो. कधी पाचोळा, कधी फुलं आणि आता फुलांचे, कळ्यांचे, गंधाचे दिवस आहेत. प्रदुषणमय शहरात कुठेकुठे झाडांनी फुलांचे बहर फेकले आहेत. आपण दुर्लक्ष केलं तरी सगळेच आपल्यासारखे नसतील. काहीजण असे असतीलच जे झाडांवरचा फुलोरा बघून वेडावून रस्त्यात थांबत असतील. हवेतला सुगंध हुंगत असतील. निसर्गातले सुंदर बदल पाहून आतून दरवळत असतील आणि मनातल्या मनात गुणगुणत असतील... 'वासंतिक समय पातला.' तर मग आपणही त्यांच्यातील एक होऊन जायला काय हरकत आहे. ही एक सकारात्मक निसर्गभक्तीच ठरावी. वेळ कोणासाठी थांबत नाही. तो त्याच्या वेगात पुढे जातच राहतो. मग आपणच क्षणिक थांबायला हवं. त्याचा आस्वाद घ्यायला हवा. त्याला खूप काही सांगायचं आहे. त्यांचं म्हणणं तर ऐकून घेऊ या!



## आरोग्यकारक टिळा

हिंदू धर्मात कपाळावर टिळा लावण्याला मोठं महत्त्व आहे. शीर, मस्तक, गळा, हृदय, दोन्ही दंड, नाभी, पाठ, काखा अशा शरीरावर एकूण बारा ठिकाणी टिळा लावण्याची प्रथा आहे. टिळा लावणं लाभदायी मानलं जातं. प्रत्येक वारानुसार टिळा लावल्याने बरेच लाभ होऊ शकतात. टिळा लावण्याच्या प्रथेबद्दलची ही सविस्तर माहिती...

कपाळाच्या मध्यभागाला ललाटबिंदू असं म्हटलं जातं. भुवयांच्या मधोमध हा ललाटबिंदू असतो. शेंदूर किंवा कुंकुम उष्ण मानलं असल्याने या स्थानी टिळा लावणं आरोग्यकारक मानलं जातं. पूजा करताना देवाला कुंकू किंवा टिळा लावणं महत्त्वाचं आहे. देवाला आंघोळ घातल्यानंतर चंदनाला टिळा लावावा. पूजा करणाऱ्यानेही मस्तकावर चंदनाचा टिळा लावला पाहिजे. यामुळे मन आणि शरीर शांत होतं. टिळा लावण्याआधी काही नियमांचं पालन करणं गरजेचं आहे. स्नान करून, रेशमी वस्त्र धारण करून उत्तर दिशेला तोंड करून मगच टिळा लावला पाहिजे. चंदनाचा टिळा शितलता देतो. अनेकदा आपण रागाच्या भरात किंवा घाईघाईत कामं उरकतो, निर्णय घेतो. उत्साहाच्या भरात आपले निर्णय चुकतात पण चंदनाचा टिळा लावल्याने उत्तेजना नियंत्रणात राहते.

कोणत्या कार्यप्रसंगी कोणत्या बोटाने टिळा लावायला हवा याचा उल्लेख विष्णू संहितेत आढळतो. शुभ आणि वैदिक कार्य करताना अनामिकेचा वापर केला पाहिजे. श्राद्धकर्म आणि पितरांशी संबंधित कार्य करताना मधलं बोट, ऋषीकार्यात करंगळी तर तांत्रिक कार्यात पहिल्या बोटाचा वापर करून टिळा लावायला हवा. यामुळे योग्य तो परिणाम साधला जातो. अनामिकेने लावलेल्या टिळ्यामुळे शांततेचा लाभ होतो. मधल्या बोटाने टिळा लावल्यावर दीर्घायुष्याचा लाभ होतो. यासोबतच अंगठ्याने टिळा लावल्याने बळ, शारीरिक क्षमता वाढते, असं मानलं जातं.

जाणून घ्या

कुमकुम, केशर, चंदन आणि भस्म अशा चार प्रकारांनी टिळा लावता येतो. कुंकवामुळे आपल्या आज्ञाचक्राची शुद्धी होते तसंच ज्ञानचक्र प्रज्वलित होतं. शांत, थंड मेंदूला केशराच्या टिळ्याने उर्जीतावस्था प्राप्त होऊ शकते. चंदनामुळे मेंदू आणि मनाला शांतता लाभते. भस्मामुळे मनात वैराग्यभावना जागृत होते. भस्मामुळे विषाणूंचा नायनाट होतो. टिळा लावल्याशिवाय संध्या केली तर योग्य तो परिणाम साधला जात नाही. चंदनाच्या टिळ्यामुळे पापांचा नाश होतो. संकटं दूर राहतात. अशा व्यक्तीवर लक्ष्मीची कृपा राहते. प्रत्येक वारानुसार टिळा लावल्याने आपल्यावर ग्रहांची कृपा राहते. सोमवार हा शंकराचा वार मानला जातो. या दिवसाचा स्वामी म्हणजे चंद्र. चंद्र मनाचा कारक मानला जातो. मनाला नियंत्रणात ठेऊन मेंदूला शांत ठेवण्यासाठी या दिवशी चंदनाचा टिळा लावा. विभूती किंवा भस्मही लावता येईल. मंगळवार हा मंगळाचा वार आहे. या दिवशी हनुमान आणि गणपतीची पूजा केली जाते. मंगळ लाल रंगाचं प्रतिनिधित्त्व करतो. त्यामुळे रक्तचंदन किंवा चमेलीचं तेल मिसळलेलं कुंकू या दिवशी लावता येईल. बुधवारी कोरडं कुंकू लावता येईल. गुरूला पांढरा आणि पिवळट रंग आवडतो. त्यामुळे गुरूवारी पांढरं चंदन उगाळून त्यात केशर मिसळून मस्तकावर टिळा धारण करावा. शुक्रवारी रक्तचंदनाचा टिळा लावल्याने ताण दूर होतो. तसंच भौतिक सुख-सुविधांची प्राप्ती होते. शनिवारी विभूती, भस्म किंवा रक्तचंदन लावलं पाहिजे. रविवारी रक्तचंदन किंवा हिरवं चंदन लावावं. यामुळे आपल्यावर भगवान विष्णूची कृपा राहते.

## सामना समस्यांचा

दैनंदिन आयुष्यात अनेक समस्या येतात. या समस्यांचा सामना करतच आपल्याला आयुष्यची प्रत्येक शिडी चढायची असते. समस्यांना घाबरून जाऊ नये. दुःख, समस्या जीवनाचा एक भाग आहे. त्या येतच राहणार. खरी गरज आहे ती या समस्यांचा सामना करून पुढे जाण्याची. दैनंदिन आयुष्यात येणाऱ्या अनेक समस्यांवर आपण मात करू शकतो. यासाठी आपण लोहचुंबकाचं उदाहरण घेऊ. लोहचुंबकात दोन गोष्टी असतात. एक असतं लोखंड तर दुसरं असतं चुंबकाच्या आसपासचं आकर्षण. हे आकर्षण, शक्ती दिसत नाही पण लोहाला ती स्वतःकडे आकर्षित करून घेत असते. आता आयुष्यातल्या समस्यांना याच्याशी जोडून बघा. आयुष्यात संकटं येतच राहणार. एक समस्या संपली की दुसरी हजर असणार. आनंद, दुःख फार काळ टिकून रहात नाही. आनंदानंतर दुःख येतं तसं दुःखानंतर सुख येतंच. आयुष्यात संकट किंवा दुःख आलं की आपल्यासोबत नेमकं काय होतं हे आधी जाणून घेऊ. एक म्हणजे आपण वैतागतो, घाबरतो आणि एकटेपणाची जाणीव आपल्या मनात घर करून राहते. अशा वेळी आपण इतरांचा आधार शोधू लागतो.



समस्यांनंतरच्या या तिन्ही स्थिती आपल्यासाठी चांगल्या नसतात. या स्थितींमध्ये आपण पूर्णपणे अडकून पडतो. या चक्रात गोलगोल फिरू लागतो. समस्यांचा सामना करताना आपल्याला नैराश्य येतं. या नैराश्याच्या गर्तेत आपण खोल खोल रूतत जातो. इतके खोल रुततो की अनेकदा आत्मघाती निर्णय घेऊन मोकळे होतो. हे चुकीचं आहे. समस्येचा परिणाम आपल्यावर होऊ द्यायचा नसेल तर सर्वात आधी समस्येला दूर करण्याचा प्रयत्न करा. समस्येला दूर सारणं म्हणजे विसरणं नव्हे पण काही काळासाठी समस्येला विसरून जा. आपल्यावर काही संकट कोसळलंय असा विचार मनात येऊ देऊ नका. आपण रस्त्याने चालत असतो. त्यावेळी इतरांना वाट करून देतो पण म्हणून आपण चालायचं थांबत नाही. त्याचप्रमाणे समस्या सोडवण्यासाठी ती विसरणं गरजेचं आहे. संकट आलं असेल तर इतरांना मदत करा, दुसऱ्या कामात मन गुंतवा. यामुळे आपल्या आतली ऊर्जा इतरांच्या दिशेने वाहू लागते आणि स्वतःवरचं लक्ष विचलित होतं. यामुळे आपल्या समस्येचा विसर पडेल. इतरांची मदत करत असल्याचं समाधान आपल्याला मिळू शकेल. इतरांना मदत केल्याने त्यांच्या दृष्टीने आपलं महत्त्व वाढेल. लोक आपली किंमत करू लागतील.

सेल्फ हेल्प

यामुळे स्वतःचं महत्त्व पटू लागेल. आपलं स्वतःचं मूल्य आपण जाणून घेऊ. याचाच अर्थ आपलं मनोबल, मानसिक क्षमता वाढेल. त्यामुळे समस्येचा सामना करताना हे उपाय नक्की आजमवा. तुम्हाला मानसिक शांतता लाभेल आणि समस्येवरचे उपाय शोधता येतील.

## मौनाची शक्ती

अध्यात्मिक उंची गाठण्यासाठी मौनव्रत धारण केलं जातं. मौन माणसाचा चांगला मित्र आहे. मौनाच्या जोरावर भगवान बुद्ध आणि महावीराने आत्मज्ञानाची प्राप्ती केली होती. मौनात एक अनोखी शक्ती असते. महर्षी रमण आणि चाणक्यालाही मौनाचं महत्त्व माहित होतं. मौन बाळगल्यावर मनात चांगले विचार येतात. मौनातूनच जगाची निर्मिती होते. शरीर तंदुरूस्त राखण्यासाठी, रोगांना दूर ठेवण्यासाठी आपण चांगलंचुंगलं खातो. पोषक आहार घेतो. तसंच मनाच्या आरोग्यासाठी मौन अतिशय महत्त्वाचं आहे. मौन ही जीवनाची परिभाषा आहे. मौनात हजारो शब्दांची ताकद असते. मौन आपल्याला बरंच काही देतं, बरंच काही शिकवतं. मौनाचं महत्त्व जाणणारे लोक कधीही अयशस्वी होत नाहीत. मौनामुळे आपण शांत राहतो. मौनामुळे स्वतःवर संयम आणि नियंत्रण ठेवणं शक्य होतं. साधनेच्या प्रत्येक मार्गात मौनाचं महत्त्व अधोरेखित करण्यात आलं आहे. मौनाशिवाय आपण अपूर्ण आहोत. स्मरणशक्ती, एकाग्रता वाढवण्यासाठी समुपदेशक मौनावर भर देण्याचा सल्ला



देतात. मौनामुळे मनावर आणि परिणामी स्वतःवर ताबा ठेवणं शक्य होतं. स्वतःसोबत काही वेळ घालवल्याने आपण बरंच काही जाणू शकतो. इतरांसोबत वेळ घालवताना स्वतःला विसरून चालत नाही. आपल्या आतला आवाज जाणून घेण्यासाठी, या पृथ्वीतलावर जन्म घेण्याचं उद्दीष्ट जाणण्यासाठी आपल्याला मौनाची मदत होते. मौनामुळे मनाची शक्ती वाढते. शरीराची शक्ती वाढते. मनाची क्षमता वाढली की क्रोध, चिंता, ताण, भीती यांना स्थान रहात नाही.

मौनाचं महत्त्व विज्ञानालाही पटलंय. शांत आणि मौनात राहिल्याने संवेदनशीलता, विचार आणि भावनांमध्ये सकारात्मक परिवर्तन होतं. अनेक चमत्कारिक परिणाम आपल्याला मिळू शकतात. मौनामुळे आपण स्वतःला ओळखू लागतो. आपल्यात सकारात्मक बदल घडू लागतात. मौनामुळे आपण जागरूक राहतो. मौनामुळे भावनांवर नियंत्रण राहतं. कोणत्याही गोष्टीचा आपल्यावर परिणाम होत नाही. आपला मेंदू सर्वात शक्तीशाली असतो. व्यायामामुळे शरीराला लाभ होतात तसंच मौन हा मेंदूचा खुराक आणि व्यायाम आहे. वादविवाद होत असतील तर शांत राहणं सर्वाधिक गरजेचं असतं. निरर्थक बाबींवर चर्चा करत राहणं, आवाज चढवून

बोध

बोलणं, कारण नसताना चर्चेत सहभागी होणं, वाद वाढवणं यामुळे आपला ताण वाढतो. प्रसंगी शांत राहणं गरजेचं असतं हे मौनातून शिकता येतं. वादविवादांमुळे मानसिक संतुलन बिघडतं, मनस्वास्थ्य हरवतं. हे सगळं टाळायचं असेल तर मौनाचे प्रयोग केले पाहिजे.

## जीवनात वेग हवाय?

आयुष्यात प्रत्येकाला यश आणि प्रसिद्धी हवी असते. या गोष्टी मिळवण्यासाठी गरज असते ती प्रयत्न, मेहनत आणि आत्मविश्वासाची. या तीन बाबींच्या जोरावर आयुष्यात काहीही मिळवता येतं. प्रतत्नांती परमेश्वर असं म्हटलं जातं. पण प्रयत्न करूनही अनेकांना अपयशाचा सामना करावा लागतो. प्रयत्न यशस्वी होण्यासाठी आपल्याला योग्य दिशा मिळावी लागते तसंच सकारात्मक वातावरणाचीही गरज असते. फेंगशुई शास्त्रात वापरल्या जाणाऱ्या काही वस्तू आणि उपायांच्या मदतीने तुमच्या प्रयत्नांना योग्य दिशा मिळू शकते. गॅझेट घोड्याच्या वापरामुळे तुमच्या प्रयत्नांना वेग येऊ शकतो. याविषयीची माहिती जाणून घेऊया...

* गॅझेट घोड्याची मूर्ती किंवा फोटो घरात ठेवता येईल. मूर्ती किंवा फोटोचा सारखाच प्रभाव पाडतो. गॅझेट घोडा योग्य दिशेला ठेवणं महत्त्वाचं मानलं जातं.
* दक्षिण आणि उत्तर या यशाच्या दिशा मानल्या जातात. घोडा दक्षिण दिशेला ठेवता येईल. तसंच करीअरची दिशा मानल्या जाणाऱ्या उत्तरेकडेही हा घोडा ठेवता येईल.



* घरात गॅझेट घोड्याचा फोटो लावता येईल. तर ऑफिसमध्ये घोड्याची मूर्ती ठेवणं अधिक लाभदायी ठरू शकतं.
* फेंगशुई शास्त्रानुसार घोडा आगीचं प्रतिनिधित्त्व करतो. त्यामुळे घोड्याला लगाम असू नये. घोडा कायम उधळलेला असावा. वेग मंदावलेल्या घोड्याचा फोटो किंवा मूर्ती ठेऊ नये.
* घोड्यासाठी योग्य दिशा मिळत नसेल तर त्याचं तोंड खिडकी किंवा दरवाज्याच्या बाजूने करा.
* बेडरूममध्ये दोन घोडे ठेवा. घोड्याच्या जोडीचं चित्रं लावा. यामुळे पती-पत्नींमध्ये वाद होत नाहीत.
* फळं फुलं, हसरी मुलं यांचे फोटो आयुष्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. असे फोटो पूर्व किंवा उत्तरेकडच्या भिंतींवर लावा.
* धनाची देवता असणाऱ्या कुबेर आणि लक्ष्मी यांचे फोटोही उत्तर दिशेला लावले पाहिजेत. यामुळे धनलाभाची शक्यता वाढते.
* निसर्गचित्रं दक्षिण किंवा पश्चिम दिशेला लावावीत.
* नद्या, झरे यांचे फोटो किंवा चित्रं उत्तर तसंच पूर्व दिशेला लावणं लाभदायी ठरतं.
* घराच्या उत्तर-पूर्व कोपरा स्वच्छ ठेवा. तसंच इथे वाहत्या पाण्याचं चित्रं लावा.

वास्तू भक्ती

* युद्धप्रसंग, रामायण-महाभारतातले युद्धप्रसंग, वैराग्य, भीतीदायक फोटो, करूण स्त्री, सुकलेलं झाड अशी चित्रं घरात लाऊ नका. यामुळे नकारात्मक प्रभाव पडतो.

## रहस्य आनंदी जीवनाचं

प्रत्येकाला सुखी आणि आनंदी जीवन जगायचं असतं. यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. अनेक युगांपूर्वी लिहिल्या गेलेल्या रामायण आणि महाभारतासारख्या ग्रंथांमध्ये सुखी आणि आनंदी जीवनाचं रहस्य दडलंय. श्रीकृष्णाने सांगितलेल्या या दहा गोष्टी अंगिकारल्या तर आपलं जीवन बऱ्याच अंशी सुसह्य होऊ शकतं.

* मनुष्य विश्वासाच्या जोरावर घडतो. तो जसा विचार करतो तसा घडतो.
* लोकांना तुमचं चांगलं बघवत नाही. तुमचा अपमान करण्यासाठी ते कायम प्रयत्नशील असतात. अपमानाबद्दल ते बोलतात पण मानी व्यक्तीसाठी अपमान मृत्यूपेक्षाही भयंकर असतो.
* प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार विचार करत असते. त्यामुळे फळाच्या अपेक्षेने कर्म करणाऱ्या अज्ञानी व्यक्तीला ज्ञानी माणसाने चुकीचं ठरवू नये.
* आपल्या कामातून आनंद मिळवण्याची सवय लागली की पूर्णत्त्व प्राप्त होतं.
* जो कामात निष्क्रियता आणि निष्क्रियतेत काम शोधतो तो खऱ्या अर्थाने बुद्धीमान मानला जातो.
* कृष्णाने म्हटलंय, मला कोणतीही व्यक्ती प्रिय नाही आणि मी कुणाचाही राग करत नाही पण माझी भक्ती करणारा माझ्यासोबत आहे आणि मी त्याच्यासोबत आहे.
* लायकी नसलेल्या व्यक्तीसाठी



आपण उगाचच शोक करत बसतो. दुःख करत बसतो. ज्ञानी माणसं जिवंत किंवा मृत व्यक्तीसाठी शोक करत बसत नाहीत.

धर्मग्रंथातून

* ज्या देवावर विश्वास असेल आणि त्याची पूजा मनापासून करण्याची इच्छा असेल त्या देवावरचा विश्वास मी दृढ करत असतो, असं कृष्ण सांगतो.
* सर्व इच्छांपासून मुक्त झालेल्या आणि अहंभाव, मीपणा सोडलेल्या व्यक्तीला शांती मिळते.
* कर्माच्या फळाची अपेक्षा न करणाऱ्या व्यक्तीला कर्म बांधून ठेऊ शकत नाही.

### नीता ठाकरे महापौर, संजय बालपांडे उपमहापौर, शिवानी दाणी स्थायी समिती सभापती

# नागपूर मनपाच्या सत्ता रचनेवर शिक्कामोर्तब

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

अनेक तर्क-वितर्कांना छेद देत भारतीय जनता पक्षाने नागपूर महानगरपालिकेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची नवी टीम जवळपास निश्चित केली आहे. अधिकृत घोषणा येत्या २ फेब्रुवारी रोजी होणार असली, तरी सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सत्तेची सूत्रे कुणाच्या हाती जाणार हे स्पष्ट झाले आहे.

दक्षिण नागपूरमधून निवडून आलेल्या सौ. नीता ठाकरे या नागपूरच्या पुढील महापौर असतील, तर मध्य नागपूरचे नगरसेवक अ‍ॅड. संजय बालपांडे यांची उपमहापौरपदी निवड होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील तरुण नगरसेविका शिवानी दाणी यांच्याकडे महापालिकेच्या तिजोरीची चावी देत त्यांची स्थायी समिती सभापती म्हणून निवड केली जाणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, सर्वाधिक २५ नगरसेवक निवडून आणणाऱ्या पूर्व नागपूर मतदारसंघातील ज्येष्ठ नगरसेवक नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर यांची सत्तापक्ष नेता म्हणून निवड निश्चित मानली जात आहे. अंतिम क्षणी काही नावांमध्ये बदल होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच सर्व भाजप आमदारांच्या उपस्थितीत राजवाडा पॅलेसमध्ये झालेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या बैठकीत या नावांवर शिक्कामोर्तब झाले. महापौरपदासाठी सुरुवातीला शिवानी दाणी यांचे नाव चर्चेत असले तरी अखेर अनुभवी नीता ठाकरे यांच्यावर पक्ष नेतृत्वाने विश्वास टाकला.

यंदा महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीत उत्तर नागपूरला डावलण्यात आल्याचे चित्र आहे. या भागातील नगरसेवकांना परिवहन, आरोग्य यांसारख्या समित्यांच्या सभापतीपदावर समाधान मानावे लागण्याची शक्यता आहे.


सौ. नीता ठाकरे


अ‍ॅड. संजय बालपांडे


शिवानी दाणी


नरेंद्र बोरकर

**पाच वर्षांत चार महिला महापौर?**

बैठकीत ठरलेल्या नियोजनानुसार महापौर व उपमहापौरांचा कार्यकाळ सव्वा-सव्वा वर्षांचा असेल. त्यामुळे पाच वर्षांत नागपूरला चार महिला महापौर व चार उपमहापौर मिळणार आहेत. तर स्थायी समिती सभापती आणि सत्तापक्ष नेत्यांचा कार्यकाळ प्रत्येकी एक वर्षाचा राहणार आहे. उपमहापौरपदासाठी अ‍ॅड. संजय बालपांडे यांचे नाव पुढे आले असले, तरी ते हे पद स्वीकारतील की नाही याबाबत साशंकता आहे. मात्र वरिष्ठ नेत्यांच्या निर्णयानुसार मिळालेले पद स्वीकारणे अपरिहार्य ठरणार असल्याचे पक्षातील जाणकारांचे म्हणणे आहे.

### कोट्यवधीच्या चोरी प्रकरणात
# दोन आरोपींना अटक

### ३ कोटी ३३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

नागपूरच्या सदर परिसरात पेट्रोलपंप चालकाच्या बंगल्यात झालेल्या चोरीप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या घटनेनंतर तेरा दिवसांनी गुन्हे शाखेने ही कारवाई केली असून, आरोपींकडून ३ कोटी ३३ लाख ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. रजनीकांत चानोरे आणि प्रताप उरकुडे अशी पोलिसांनी अटक केलेल्या दोन चोरांची नावे आहेत. हे दोघेही भंडारा जिल्ह्यातील रहिवासी आहेत.



या प्रकरणातील मुख्य आरोपीने चोरी केलेले पैसे आपल्या प्रेयसीवर खर्च करण्याची योजना आखली होती, अशी माहिती समोर आली आहे. त्याची प्रेयसी हैदराबाद येथे एमबीबीएसचे शिक्षण घेत असून, आरोपीला तिला भारतातील विविध पर्यटनस्थळी फिरवण्यासाठी आणि महागड्या भेटवस्तू देण्यासाठी पैशांची गरज होती.

शिर्के लेआउट येथील रहिवासी बलजिंदर सिंग इंद्रजित सिंग नय्यर (५६) आणि त्यांचे बंधू शहरात पेट्रोल पंप व इतर व्यवसाय चालवतात. १९ जानेवारी रोजी सायंकाळी बलजिंदर सिंग यांच्या धाकट्या मुलाचा कळमेश्वर येथील फार्महाऊसवर साखरपुडा होता. त्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्य फार्महाऊसवर गेले होते आणि घरात कोणीही नव्हते. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्याने घराच्या मागील बाजूस असलेल्या स्वयंपाकघरातील खिडकीचे ग्रील तोडून घरात प्रवेश केला.

चोरट्याने बलजिंदर यांच्या आईच्या खोलीतील कपाटाचे कुलूप तोडून २४७ ग्रॅम सोन्याचे दागिने, १ कोटी रुपये किमतीचे हिऱ्यांचे दागिने आणि त्यांच्या भावाच्या खोलीतून ६५ लाख रुपये रोख रक्कम लंपास केली. एकुण ३ कोटी ९१ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. ही रोख रक्कम तीन दिवसांच्या पेट्रोल विक्रीतून जमा झाली होती.

२० जानेवारी रोजी सकाळी नय्यर कुटुंब घरी परतल्यावर त्यांना कपाटांची कुलुपे तुटलेली आणि मौल्यवान वस्तू गायब झाल्याचे दिसले. त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकारी, श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञ घटनास्थळी दाखल झाले.

२० जानेवारी रोजी सदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चोरट्याने घरात प्रवेश करण्यापूर्वी सीसीटीव्ही कॅमेरे झाकण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, एका अन्य कॅमेऱ्यात आरोपी चोरी करताना कैद झाला होता, ज्यामुळे पोलिसांना तपासात मदत झाली. पोलिसांना घाम फोडणाऱ्या या दोन हायटेक चोरांना गुन्हे शाखेने ठाणे येथून अटक केली.

## तटकरे-पटेलांच्या 'खेळी'वर दानवेंचा प्रहार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१ :

महाराष्ट्र अद्याप अजितदादांच्या निधनाच्या धक्क्यातून सावरलेला नाही, तोच राजकारणात 'पॉवर गेम'ला हिणकस वळण लागले आहे.

सुनेत्रा पवार यांच्या संभाव्य शपथविधीवरून शिवसेना (ठाकरे गट) नेते अंबादास दानवे यांनी सत्ताधारी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेतृत्वावर तोफ डागली आहे.

सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे नेते स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतात, असे खळबळजनक विधान करत दानवे यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.



अजितदादांच्या एक्झिटला अवघे चार दिवस झाले असतानाच सत्तेची पदे वाटली जात असल्याबद्दल दानवे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. कुटुंबात आणि राज्यात अजूनही दुखवटा आहे, अशा वेळी खुर्चीसाठी होणारी ही धावपळ संतापजनक आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

तटकरे आणि पटेल यांनी केवळ आपली मंत्रिपदे आणि पक्षावरील ताबा सुरक्षित करण्यासाठी सुनेत्रा वहिनींना 'ढाल' म्हणून वापरल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

शरद पवारांनी आज सकाळी केलेल्या गौप्यस्फोटाचा आधार घेत दानवे यांनी सत्ताधाऱ्यांची कोंडी केली.

जर १२ तारखेला दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या, तर मग आताच वेगळ्या शपथविधीची ही घाई कशासाठी? यावर भाष्य करताना दानवे म्हणाले, तटकरे आणि पटेलांना एक अनामिक भीती सतावत आहे. जर शरद पवार पुन्हा सक्रिय झाले, तर त्यांचे राजकीय अस्तित्व धोक्यात येईल. याच भीतीपोटी त्यांनी अजितदादांच्या इच्छेविरुद्ध जाऊन सत्तेचा हा नवा डाव मांडला आहे.

**राजकीय नैतिकतेचा अंत?**

अजितदादांच्या निष्ठावान कार्यकर्त्यांच्या भावना अद्याप अनावर आहेत, तरीही मुंबईत मंत्रिपदाच्या आणि शपथविधीच्या चर्चा रंगत आहेत. या नेत्यांना ना नात्यांचे सोयरसुतक उरले आहे, ना निधनाचे गांभीर्य, असे म्हणत दानवे यांनी थेट राजकीय नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ३१ :

तालुक्यातील ताडोबा जंगल लगतच्या चोरगाव मधील उद्धव वारलू मोहुर्ले (६५) यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. वरवट चोरगाव मार्गावरील शेतीच्या कामासाठी स्वतःच्या शेतात गेले असताना त्यांच्यावर वाघाने हल्ला केला व जंगलात फरफटत नेले. रात्रभर शोध घेतल्यानंतर तपास लागला नाही.



शनिवार ३१ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास वन विभागाच्या स्थानिक कर्मचाऱ्यांनी शोध घेतल्यानंतर ५८५ कंपार्टमेंट मध्ये मृतदेह आढळला. मृतदेह शवविच्छेदनसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

## राख अजून शांत झालेली नाही तरीही...

### संजय राऊत यांच्या वक्तव्याशी संजय गायकवाडांची सहमती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघातात झालेल्या अकाली निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या आणि वेगवान घडामोडी घडल्या.

अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदी शपथ घेणार आहेत. सुनेत्रा पवार या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या. दुःखद घटनेनंतर इतक्या लवकर सत्ता बदलाचा निर्णय झाल्याने राजकीय वतुर्ळात विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

या शपथविधीवर प्रतिक्रिया देताना शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी सूचक आणि भावनिक भाष्य केले आहे. अजित दादांची राख अजून शांत झालेली नाही. इतक्या लवकर अशा घडामोडी होतील, असं वाटलं नव्हतं, असे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे शोक आणि राजकारण यातील ताण पुन्हा एकदा समोर आला आहे.

मात्र, त्यांनी हेही स्पष्ट केले की हा निर्णय पवार कुटुंबाचा एकत्रित आणि सामूहिक निर्णय असू शकतो. गेल्या काही दिवसांतील घडामोडी पाहता, अजित पवारांचीही मानसिकता दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन निर्णय घेण्याचीच होती, असे गायकवाड यांनी सांगितले.

संजय गायकवाड पुढे म्हणाले की, या संपूर्ण प्रक्रियेमागे पवार कुटुंबाचा समन्वय दिसतो. दोन्ही कुटुंबांनी बसून हा निर्णय घेतला आहे. त्यांच्या पाठीशी भीष्मपितामह म्हणून शरद पवार उभे आहेत. त्याचवेळी अजित पवारांच्या निधनामागे कोणताही घातपात नसून हा केवळ आणि केवळ अपघात असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. अपघाताबाबत संशय पसरवणा?्या चर्चांवर पूर्णविराम देण्याची गरज असल्याचे संकेत त्यांच्या वक्तव्यातून मिळाले.

दरम्यान, या विमान अपघाताची सखोल चौकशी झालीच पाहिजे, अशी भूमिका आमदार संजय गायकवाड यांनी घेतली आहे. सर्वजण चौकशीची मागणी करत आहेत आणि मीही तीच मागणी करतो, असे ते म्हणाले. अजित पवारांच्या चारित्र्यावर किंवा त्यांच्या प्रतिमेवर कलंक लागेल, अशा चर्चा आता थांबल्या पाहिजेत, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले.

## तृतीयपंथीयांचा रेल्वेत गोंधळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

रेल्वेत प्रवाशांना वेठीस धरून जबरीने त्यांच्याकडून पैसे वसूल करणाड्या आणि रेल्वेत गोंधळ घालणाड्या चार तृतीयपंथींना राजनांदगावच्या रेल्वे सुरक्षा बलाने अटक केली. मधु, सोनाली, काजल आणि ढिल्लू (सर्व रा. साईनगर, उलार्कुर्ला, जि. दुर्ग) अशी या तृतीयपंथीयांची नावे आहेत.

रोमेशकुमार हे आपल्या कुटुंबियांसह बिलासपूर सुपरफास्टने गोंदिया ते रायपूर असा प्रवास करीत होते. इंजीनला लागूनच त्यांचा डबा होता. दरम्यान, एका स्थानकाहून हे तृतीयपंथी रेल्वेत चढले. रोमेशकुमारच्या डब्यात येऊन जबरीने त्यांनी प्रवाशांकडून पैसे वसूल करायला सुरुवात केली. रोमेशकुमार यांनी पैसे देण्यास नकार दिला असता त्यांच्या कुटुंबियांसमोर ते अश्लिल हावभाव करू लागले. त्यामुळे रोमेशकुमार संतप्त झाले. त्यांनी रेल्वेकडे तक्रार केली.

राजनांदगावच्या प्रभारी निरीक्षक तरुणा शाहू यांना ही माहिती समजताच त्यांनी रोमेशकुमार यांच्याशी संपर्क केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता राजनांदगाव रेसुबचे पथक एक क्रमांकाच्या फलाटावर दाखल झाले. उपनिरीक्षक प्रसाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्येक डब्यांची तपासणी करून शेवटी चारही तृतीयपंथीयांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे तिकीट नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रवाशांना त्रास देऊन त्यांच्याकडून जबरीने पैसे वसूल केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली.

# यवतमाळची हिरा करणार

### आंतरराष्ट्रीय युवा संमेलनात भारताचे प्रतिनिधित्व

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ३१ :

येथील पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी हिरा राखी देशमुख हिची व्हिएतनाम येथे होणाऱ्या सातव्या आंतरराष्ट्रीय युवा शिखर संमेलनासाठी निवड झाली आहे. या जागतिक मंचावर ती भारताचे प्रतिनिधित्व करणार असून, उद्या शनिवारी ३१ जानेवारी रोजी ती व्हिएतनाममधील 'हो ची मिन्ह' शहराकडे रवाना झाली आहे.



या संमेलनासाठी देशभरातून अनेक तरुणांचे अर्ज आले होते. अत्यंत कठीण मुलाखत प्रक्रिया, नेतृत्व क्षमता आणि युवकांना प्रेरित करण्याची कौशल्ये या निकषांवर हिराची निवड करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, या संमेलनाचा संपूर्ण खर्च आयोजकांकडून केला जाणार आहे. हिरा देशमुख सध्या वायपीएस शाळेत अकरावी विज्ञान शाखेत शिकत आहे. ती बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची धनी असून, अवघ्या १६ वर्षांच्या हिराच्या नावावर अनेक पुरस्कार आहेत. तिला रनिंगमध्ये सात, निबंध स्पर्धेत दोन सुवर्ण पदक मिळाले आहेत.

कविता, वादविवाद स्पर्धा, उत्कृष्ट संचालनासाठीही अनेक पुरस्कार तिला मिळाले आहेत. नागपूर येथील एमयूएनबीमध्ये तिला 'बेस्ट व्हर्बल मेंशन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तिने अनेक व्यवसायिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन केले आहे.

हिरा धनुर्विद्येत पारंगत असून तिला लहानपणापासूनच वाचनाची आवड आहे. या आवडीमुळे ती विद्यार्थ्यांमध्ये समन्वयक म्हणूनही काम करते. झरी-जामणी येथील राजीव गांधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. राखी देशमुख यांची ती कन्या आहे.

त्यांच्या राजराजेश्वरी बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यातही हिराचा सहभाग असतो. हिराच्या या यशामुळे यवतमाळच्या शैक्षणिक वैभवात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ग्रामीण भागातील मुली जागतिक स्तरावर नेतृत्व करू शकतात, हे हिराने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले. हिराच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## देवदर्शनासाठी गेलेला तरुण कपिलेश्वर डोहात बुडाला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

शनिवारी सुटीमुळे कळमना परिसरातील ३५ जण देवदर्शनासाठी केळवद परिसरातील कपिलेश्वराच्या दर्शनासाठी गेले होते. मात्र तरुणाच्या अती उत्साही स्वभावामुळे संपूर्ण कुटुंबावर पश्चाताप करण्याची वेळ शनिवारी ओढवली.

दर्शनासाठी अंघोळीसाठी पाण्यात उतरलेल्या तरुणाचा खोलीचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाला. केळवद ग्रामीण पोलीस हद्दीतील कपिलेश्वर संगमावर शनिवारी दुपारी दिडच्या सुमारास ही घटना घडली.

यश भोलाशंकर राठोड (१९) रा. कळमना असे कपिलेश्वर मंदिर संगमावर बुडालेल्या तरुणाचे नाव आहे. कळमना परिसरातील ३५ जणांनी शनिवारी पिकनिकसाठी योजना केली. त्यानुसार सकाळी यश हा आपली आई शिवा आणि बहिण स्वातीसह कपिलेश्वरच्या दर्शनासाठी गेले. दर्शन घेतल्यानंतर यश याला पाण्यात उतरण्याचा मोह झाला. कपडे काढून त्याने पाण्यात उडी घेतली.

मात्र खोलीचा अंदाज न आल्याने यश लगेच गटांगळ्या खाऊ लागला. हे पाहून परिसरातील नागरिकांनी आरडाओरड सुरू केली. लगेच काही जणांनी हितज्योती आधार फाउंडेशनचे हितेश बनसोड यांना माहिती दिली. त्यांनी केळवद पोलीस ठाण्याला सुचना केली. त्याच वेळी गस्तीवर निघालेले केळवदचे ठाणेदार आशिष सिंह ठाकूर, मेजर सुधीर यादगिरे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

**ठाणेदारांनी स्वत: मारली उडी**

अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी पोचलेले ठाणेदार ठाकूर यांनी घटनेचे गांभिर्य ओळखून जीवावर उदार होत पाण्यात उडी घेतली. चांगले पोहता येत असल्याने ठाणेदार ठाकूर यांनी खोल बुडालेल्या यश राठोडला बाहेर काढले.

मात्र, नाकातोंडात पाणी गेल्याने मुलाला तत्काळ सावनेर येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून मुलाला मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पिकनिकसाठी गेलेल्या कुटुंबावर मुलाच्या अतिउत्साहामुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### अजितदादांच्या 'घड्याळा'ची सूत्रं
# आता वहिनींच्या हाती

■ दीपक कैतके
मुंबई, दि. ३१ :

राज्याच्या राजकारणातील सर्वात मोठा सस्पेन्स अखेर संपला आहे. अजित दादांच्या एक्झिटनंतर पोरक्या झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला नवा 'कॅप्टन' मिळाला आहे.

अजितदादांची रिक्त जागा भरण्यासाठी पक्षाने सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड केली आहे. ज्येष्ठ नेत्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे आता सरकारमधील राष्ट्रवादीचा चेहरा अधिकृतपणे बदलला असून, सत्तेची नवी समीकरणं आता वहिनींच्या भोवती फिरणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

गेल्या दोन दिवसांपासून पक्षात नेतृत्वावरून अनेक नावं चर्चेत होती. मात्र, आज झालेल्या बैठकीत ज्येष्ठ नेते दिलीप वळसे-पाटील यांनी सुनेत्रा वहिनींच्या नावाचा प्रस्ताव मांडला आणि त्याला छगन भुजबळ यांनी तातडीने दुजोरा दिला.

ही निवड बिनविरोध करून राष्ट्रवादीच्या नेत्यांनी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे.... पक्ष अजूनही पवार कुटुंबाच्याच नेतृत्वाखाली एकजूट आहे.

**'वर्षा' वरील खलबतं यशस्वी**



**निवडीमागचं खरं गुपित काय?**

सुनेत्रा पवार यांची निवड ही केवळ भावनिक नसून त्यामागे मोठी राजकीय रणनीती दडलेली आहे.

**आमदारांची मोट:** अजितदादांच्या गटातील आमदारांना फुटण्यापासून रोखण्यासाठी 'पवार' हे नाव असणं अनिवार्य होतं.

**दिल्लीचा कौल:** राज्यसभा खासदार म्हणून सुनेत्रा वहिनींचा दिल्लीतील वावर आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी असलेले संबंध पक्षासाठी फायद्याचे ठरणार आहेत.

**विलीनीकरणाला 'चेकमेट':** शरद पवारांनी विलीनीकरणाच्या चर्चा सुरू करून जो पेच निर्माण केला होता, त्याला ही निवड म्हणजे एक चोख उत्तर मानलं जात आहे.

सुनेत्रा पवार यांचा खरा कस लागणार आहे तो विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात. अजितदादांच्या त्या तडफदार भाषणांची आणि कार्यपद्धतीची जागा सुनेत्रा वहिनी कशा प्रकारे घेतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे डोळे लागले आहेत.

## ट्रॅक्टर ट्रॉलीवर दुचाकी धडकली : दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३१ :

शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून जाणाऱ्या खरपी ते बहिरम मार्गावरील निंभोरा फाट्याजवळ एक ट्रॅक्टर ट्रॉली नादुरुस्त झाल्यामुळे रस्त्यावर उभी होती. त्यावेळी मागून आलेली एक दुचाकी या ट्रॉलीवर जाऊन धडकली.

या अपघातात दुचाकीवरील दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. हा अपघात शुक्रवारी (दि. ३०) रात्री आठ वाजताच्या सुमारास झाला आहे. दोन्ही मृतक मध्यप्रदेशातील बैतुल जिल्ह्यातील रहीवासी आहेत. विजय झर्री कास्देकर (२२) आणि शिवलाल हिरालाल धाडसे (५५, दोघेही रा. लोपईठाना ता. आठनेर जि. बैतूल) अशी अपघातातील मृतकांची नावे आहेत.

रात्री साडेसात ते आठ वाजताच्या सुमारास विजय व शिवलाल हे दुचाकीने जात होते. त्यावेळी मार्गातील निंभोरा फाट्याजवळ मका घेऊन जाणारी एक ट्रॅक्टर ट्रॉली नादुरुस्त स्थितीत उभी होती. ही ट्रॉली दुचाकी चालकाला दिसली नाही, त्यामुळे भरधाव दुचाकी ट्रॉलीवर मागून जोरदार जाऊन धडकली.

या अपघातात दुचाकीवरील दोघेही जागीच मरण पावले आहे. दोघांनाही अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले असुन त्यांच्या नातेवाईकांना माहीती देण्यात आली आहे. अपघाताची माहीती मिळताच शिरजगावचे ठाणेदार महेंद्र गवई पथकासह घटनास्थळी पोहचले. गावकरी व पोलीस पथकाच्या मदतीने मृतदेह रूग्णालयात नेण्यात आले.

## टेम्पोच्या धडकेने चिमुकली ठार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :

घरासमोर खेळत असलेल्या चिमुकलीला टेम्पोचालकाने धडक देऊन जागीच चिरडल्याची घटना वाठोडा हद्दीत साईबाबानगर, खरबी येथे घडली.

दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली. घटनेच्या वेळी प्रियांशी विष्णू देवपाच ही १८ महिन्याची चिमुकली घरासमोर खेळत होती. त्याचवेळी टेम्पोचालकाने प्रियांशीला धडक देऊन जागीच चिरडले.

याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी अपघाताचा गुन्हा नोंदवून टेम्पोचालक विष्णू सावनलाल गौतम (५१) धनगवळीनगर यास अटक केली. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

# 'त्या' शिक्षकांची सेवा संपुष्टात येणार?

**शालार्थ आयडी घोटाळा**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

नागपूर जिल्ह्यात शालार्थ आयडी घोटाळा समोर आला होता. या प्रकरणाची चौकशी पोलिसांसोबत राज्याच्या विशेष तपास समिती मार्फत चौकशी सुरू आहे.

पोलिसांनी गुन्हे दाखल करून आतापर्यंत ३० वर आरोपींना अटक केली आहे. यात शिक्षण आजी- माजी शिक्षण उपसंचालक, प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांचाही समावेश आहे. या कारवाईमुळे शिक्षण विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे. या घोटाळ्यानंतर शिक्षण विभागाने पगार मंजूर करण्यासंदर्भात अनेक नव्या अटी घातल्या. हा घोटाळा समोर आल्यानंतर संबंधित शिक्षकांचे पगार ही रोखण्यात आले.

गेल्या दहा महिन्यापासून त्यांचे पगार झाले नाही. दरम्यान शिक्षण प्रधान सचिवांनी या घोटाळ्याशी संबंधित शिक्षकांची एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फच चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानंतर शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी संबंधित सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा संचालकांना नोटीस पाठवून सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगितले. त्यांच्याकडून सुनावणी घेण्यात आली.

ज्यांना कागदपत्र सादर केले नाही, त्यांच्याबाबत मोठा निर्णय घेण्यात येणार असल्याची चर्चा आहे. बोगस शालार्थ आयडी प्रकरणातील संशयित शिक्षकांची सुनावणी उपसंचालक घेत असून कागदपत्र सादर न केलेल्या शिक्षकांची सेवाच समाप्त करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

नागपूर जिल्ह्यात बोगस शालार्थ आडीच्या माध्यमातून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची खासगी अनुदानित शाळेत नियुक्ती करून पगार सुरू करण्यात आल्याच प्रकार समोर आला. या प्रकरणी आदेश नसताना ऑनलाईन शालार्थ प्रणालीचा गैरवापर करून ६३२ शिक्षकांची शालार्थ आयडी तयार करण्यात तक्रार उपसंचालक कार्यालयाकडून सायबर पोलिसांकडे करण्यात आली. त्यापूर्वी एक तक्रार सदर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

या प्रकरणात आतापर्यंत ३० आरोपींना अटक करण्यात आली. या शिक्षण उपसंचालक, प्राथमिक शिक्षणाधिकारी, वेतन पथक अधीक्षक, कर्मचारी, शिक्षक, मुख्याध्यापक व शाळा संचालकांचा समावेश आहे.

या प्रकरणी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांनी संचालकांच्या अध्यक्षतेत चौकशी समिती नेमली. समितीने कागदपत्र नसलेल्या ६३२ शिक्षकांची एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत सुनावणी घेण्याचा अहवाल दिला. त्या आधारे शिक्षण उपसंचालक माधुरी सावरकर यांनी संबंधित सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा संचालकांना सुनावणी संदर्भात नोटीस पाठविल्या. सुनावणीही घेण्यात आली. ज्या शिक्षकांचे कागदपत्र सादर झाले नाही, अशांची सेवा समाप्त करण्याची शिफारस करण्यात येणार असल्याचे समजते.

दरम्यान, सातत्याने होणारी चौकशी आणि कारवाईच्या भितीने संबंधित शिक्षक व त्यांचे कुटुंबीय धास्तावले आहेत.